TIGHT BINDING BOOK

TEXT PROBLEM
WITHIN THE
BOOK ONLY
TEXT FLY WITHIN
THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_196185
UNIVERSAL LIBRARY

# इस्लाम आणि नीतिशास्त्र

आवृत्ति पहिली

लेखक

सय्यद अहंमद अमीन

सांगली

[ सर्व हक्क स्वाधीन ]

९३८ ]

[ किं. १ रुपया

प्रकाशक :
**सय्यद अहंमद अमीन**
सांगली ( S. M. C. )

मुद्रक :
**स. रा. सरदेसाई**, बी.ए., एल्एल्.बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखाना,
४१ बुधवार, पुणें २

जगद्वंद्य

महात्मा गांधीजींस

अर्पण

# कृतज्ञता

प्रस्तुत लहानसें पुस्तक लिहून तें प्रसिद्ध करण्याचा योग लाभल्याबद्दल, पहिल्या प्रथम त्या सर्वशक्तिमान परमेश्वराचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

माझ्या पहिल्या पुस्तकाचें– 'हजरत महंमद पैगंबर' चरित्राचें–महाराष्ट्र जनतेनें मनःपूर्वक स्वागत केल्याबद्दल मला अत्यंत कृतज्ञता वाटते. इस्लाम-धर्माची शिकवण संकलित करून ती प्रसिद्ध करण्याबद्दल अनेक वाचकांकडून सूचना आल्यामुळें, त्या दृष्टीनें हा लहानसा प्रयत्न केला आहे. सदर प्रयत्न सहृदय वाचकांस आवडेल अशी आशा आहे.

इस्लाम-धर्मात पवित्र कुराणांतील महावाक्यें आणि हजरत महंमद पैगंबर यांची वचनें, धर्माज्ञा समजल्या जातात. या धर्माज्ञांचें संकलन करण्याचे कामी लाहोरचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर महंमद अमीन व मौलाना महंमद युसफ वगैरे विद्वानांची मला फार मदत झाली, ही गोष्ट आभारपूर्वक नमूद करावीशी वाटते. पवित्र कुराणाच्या महावाक्यांतील आवश्यक तेवढाच भाग ठिकठिकाणी घेण्यांत आला आहे.

महाराष्ट्रांतील सुविख्यात मुसलमान विद्वद्वर्य खानबहादूर प्रोफेसर शेख अबदुल कादिर, एम्. ए., आय्.ई. एस्. ( रिटायर्ड ), यांनीं प्रस्तुत पुस्तक वाचून ज्या बहुमोल सूचना केल्या त्यांबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें. त्या सूचनांचा विचार शुद्धिपत्रकांत केला आहे, तिकडे वाचकांनी अवश्य लक्ष द्यावें. याखेरीज ज्या कांही चुका गडबडीमुळें राहून गेल्या असतील त्या पुढील आवृत्तीत अवश्य सुधारल्या जातील.

या पुस्तकाच्या प्रसिद्धीकरणाकरितां माझे स्नेही व पुण्याचे सुप्रसिद्ध व्यापारी मे. अहंमद इब्राहीम हारून जाफर, माजी एम्. एल्. ए. (दिल्ली),

मुंबईचे धनिक मे. मोहंमद हाजी कासम, सुरतचे आमदार ए. ई. सिंगापुरी, एम्. एल्. ए., सांगलीचे देशभक्त जे. बी. आरवाडे, बेळगांवचे देशभक्त गंगाधरराव देशपांडे यांनीं प्रशंसनीय आर्थिक मदत केली याबद्दल या उदार-चरितांचा मी अत्यंत आभारी आहें.

शेवटी जे माझ्या ओबडधोबड वाङ्मयकृतीचें नेहमी कौतुक करून मला मदत करीत, अशा नुकत्याच दिवंगत झालेल्या दोन व्यक्तींचा उल्लेख केल्याखेरीज राहवत नाहीं. मुंबईचे नामांकित दानशूर नागरिक व सर करीमभाई इब्राहीम यांचे श्वशुर अल्-हज् कासीमअल्ली जिराजभाई पीरभाई हे स्वतः श्रेष्ठ दर्जाचे साहित्यिक व इस्लाम-धर्माचे अभ्यासू असल्यामुळें त्यांच्याकडून मला वारंवार महत्त्वाची माहिती व आर्थिक साहाय्य मिळत असे. त्याचप्रमाणें कऱ्हाडचे धनाढ्य व्यापारी आमदार हाजी अहंमद कासम, एम्.एल्.ए., यांनीहि मला वेळोवेळी प्रोत्साहन देऊन, अंतःकरणपूर्वक मदत केली आहे. या उदार सद्गृहस्थांची मला सदैव आठवण होत राहील.

सांगली }

सर्वांचा नम्र
स. अ. अमीन

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ |
| १. | प्रास्ताविक | १ |
| २. | सत्य आणि न्याय | ३ |
| ३. | सच्छीलता | ७ |
| ४. | सत्कृत्य | ११ |
| ५. | प्रामाणिकपणा | १४ |
| ६. | सभ्यता | १९ |
| ७. | शिष्टाचार | ३४ |
| ८. | कर्मयोग | ४० |
| ९. | धैर्य | ४७ |
| १०. | ज्ञान-प्राप्ति | ५० |
| ११. | शेजारधर्म | ५५ |
| १२. | आईबापांवर प्रेम | ५९ |
| १३. | स्त्रीदाक्षिण्य | ६२ |
| १४. | क्षमा | ६७ |
| १५. | सहिष्णुता | ७० |
| १६. | समता | ७६ |
| १७. | दया | ८२ |
| १८. | औदार्य | ८९ |
| १९. | मानवता | ९६ |

# इस्लाम आणि नीतिशास्त्र

"इस्लामच्या नीतिशास्त्राचा त्या धर्माशीं निकट संबंध आहे आणि त्या नीतिशास्त्राचीं तत्त्वें परमेश्वरी आज्ञा म्हणून संबोधिल्या जातात."

—सर थॉमस अर्नोल्ड,
डी.लिट्., पीएच्.डी.

इस्लाम-धर्माचा नीतिशास्त्राशीं इतका जिव्हाळ्याचा संबंध आहे कीं नीतिशास्त्राशिवाय इस्लाम-धर्माला स्वतंत्र अस्तित्वच राहूं शकत नाहीं. धर्मतत्त्वांइतकेंच नीतितत्त्वांस महत्त्व दिल्याखेरीज इस्लाम-धर्माचें परिपूर्ण पालन होत नाहीं. नीतितत्त्वें म्हणजे परमेश्वराच्या आज्ञा समजून प्रत्येक मुसलमान म्हणविणाऱ्यानें तीं आत्मसात् केलीं पाहिजेत. नुसत्या धर्मतत्त्वांना मान दिला किंवा धार्मिक विधी बरोबर पाळले म्हणजे आपण इस्लाम-धर्माच्या ऋणांतून सुटलों अशी कुणाची कल्पना असेल तर ती चूक आहे. धर्म आणि नीति यांमध्यें इस्लाम फरकच मानीत नाहीं. नीतीचा विकास होत जाणें म्हणजेच परमेश्वराच्या स्वरूपाशीं तादात्म्य होत जाणें होय आणि अशी तादात्म्यता होण्यांतच इस्लाम-धर्माचें सारसर्वस्व सांठविलें आहे.

नीतिकल्पना धर्मावर अवलंबून असत नाहींत. अमुक एक धर्म थोर म्हणून त्या धर्मांतील नीतिकल्पना उच्च व प्रशंसनीय असें

कुठल्याहि समंजस माणसास म्हणतां येणार नाहीं. उलट अमक्या नीतिकल्पना उत्कृष्ट म्हणून त्या नीतिकल्पना ज्या धर्मात आहेत तो धर्म श्रेष्ठ असें म्हणणें अधिक सयुक्तिक दिसेल. अगदीं सोप्या रीतीनें सांगावयाचें झाल्यास धर्माची योग्यता त्यामधील नीतिशास्त्रावर अवलंबून असते असें सांगतां येईल.

नीतिकल्पनांचें स्वरूप अत्यंत व्यापक असावें लागतें. ठराविक जातीपुरत्याच किंवा मूठभर समाजापुरत्या त्या नीतिकल्पना असतील तर त्यांना नीतिकल्पना या नांवानें संबोधणें धाष्ट्र्याचें ठरेल. औदार्य ही एक श्रेष्ठ नीतिकल्पना आहे; पण या औदार्याची दृष्टि फक्त आपल्या कुटुंबियांपुरतीच ठेवूं तर त्या औदार्यास स्वकर्तव्य यापलीकडे कांहीं महत्त्व राहणार नाहीं. पण तेंच औदार्य फक्त कुटुंबापुरतें न दाखवितां, मानवजातीकरितां दाखवूं तर त्या औदार्याचें स्वरूप उज्ज्वल ठरणार आहे. संकटांत सांपडलेल्या कुठल्याहि माणसास त्याच्या जातीचा, धर्माचा, किंवा राष्ट्रीयत्वाचा विचार न करतां त्याच्या मदतीकरितां धांवणें, त्याला संकटमुक्त करणें हीच औदार्याची उच्च नीतिकल्पना होय. मानवजातीला सौख्य देणाऱ्या नीतिकल्पनाच यापुढें जगांत चिरंजीव राहणार आहेत. अशा नीतिकल्पनांचा परिपोष इस्लामधर्मात झाला आहे कीं काय याचेंच आपणांस थोडक्यांत विवरण करावयाचें आहे.

---

*

## सत्य आणि न्याय

> "जरी तें सत्य तुमच्या स्वतःच्या अगर तुमच्या आईबापांच्या अगर नातेवाईकांच्या विरूद्ध असलें तरी पर्वा न करतां सत्याचा पुरस्कार करा."
>
> —पवित्र कुराण, ४ : १३५

प्रत्येक व्यक्तीनें सत्य आणि न्याय यांचें अवलंबन करणें आपलें पवित्र कर्तव्यकर्म समजलें पाहिजे. आपल्यास वाटेल तेवढीं संकटें भोगावीं लागलीं तरी सत्यापासून आपण च्युत होतां कामा नये. सत्याच्या परिपालनार्थ वाटेल तेवढा स्वार्थत्याग करावा लागला, वाटेल तेवढी झीज सोसावी लागली, वाटेल तेवढ्या खस्ता खाव्या लागल्या तरी सत्यापासून एक रेसभर देखील मागें न हटण्याची तयारी दर्शविली पाहिजे. सत्याचरण ही आपली सत्त्वपरीक्षा आहे असें समजून, या परीक्षेंतून उत्तीर्ण होतेवेळीं आपल्या कुटुंबियांची किंवा आप्तेष्टांची पर्वा करून उपयोगी नाहीं. प्रसंग पडल्यास त्यांच्याविरुद्ध जाण्याची आपली तयारी पाहिजे.

सत्य सुखासुखी पचवितां येत नाहीं; त्याकरितां मनाची विलक्षण तयारी लागते. जगाचा व्यवहार असत्यावर चाललेला आहे हें आपण पाहतों. असत्यानें वागणारीं माणसें मोठ्या इतमामानें आणि दिमाखानें वावरत असलेलीं आपल्या दृष्टीस पडतात. धडधडीत असत्य विधानें करणारे गृहस्थ संभावित समजले जातात. अशा परिस्थितींत

" **सत्याचे प्रयोग** " करावयास निघणें अत्यंत त्रासाचें व धाडसाचें ठरतें. पण मानवांच्या सौख्याकरितां अशा तऱ्हेचा त्रास सोसण्याची प्रत्येकानें तयारी दाखविली पाहिजे.

> **" सत्यापासून त्रास झाला तरी सत्य सोडूं नका आणि असत्यापासून फायदा होतो म्हणून असत्याचें अवलंबन करूं नका. "**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

सत्यापासून त्रास होणार अशी खूणगांठ बांधूनच आपण आपलें सत्यव्रत चालू ठेविलें पाहिजे. असत्यापासून फायदा होतो असें आपणांस दिसून आलें तरी असत्याकडे ढुंकून देखील पाहूं नये. असत्यापासून होणारा फायदा क्षणैक असतो; त्यापासून मनाला शांति व समाधान कधींच मिळत नाहीं. क्षणैक टिकणाऱ्या फायद्या-पेक्षां, सत्याच्या खडतर तपश्चर्येमुळें मिळालेला फायदा कितीतरी पटींनीं श्रेष्ठ व चिरंजीव असतो. सत्याची सुरुवात जरी दुःखाच्या सुस्कारांत झाली तरी त्याची परिणति समाधानाच्या गोड निःश्वासांत होत असते. असत्यापासून झालेल्या तात्पुरत्या व अल्पजीवी समाधाना-पेक्षां, अशा तऱ्हेचें समाधान कितीतरी शाश्वत व आल्हादकारक असतें.

> **" न्यायी व्हा अशी परमेश्वराची आज्ञा आहे. "**
>
> —पवित्र कुराण, १६ : ९०

सत्यनिष्ठेप्रमाणेंच न्यायनिष्ठुरता आपल्या अंगीं बाणली पाहिजे. न्याय करते वेळीं जात, गणगोत, स्नेहसंबंध यांचा काडीमात्र विचार करतां कामा नये. आपण आपल्या जातीकडे पाहून न्याय दिला किंवा

स्नेहसंबंध लक्षांत घेऊन न्यायनिवाडा केला तर त्याला न्याय न म्हणतां न्यायाची विटंबना म्हणावें लागेल. न्यायदानाचें काम करते वेळीं आपण निष्ठुर बनलें पाहिजे; हळुवार भावनांचा पगडा आपल्या मनावर बसूं देतां उपयोगी नाहीं. आपल्या पोटच्या गोळ्याविरुद्ध न्याय द्यावा लागला तरी अपत्य-प्रेमाचा काडीमात्र विचार न करतां न्याय देण्याची तयारी दर्शविली पाहिजे. योग्य न्याय देणें म्हणजे परमेश्वराच्या आज्ञेचें पालन करणें आहे, हें सतत आपल्या लक्षांत ठेविलें पाहिजे.

> **“ ( एकाद्या जातीच्या ) लोकांशीं द्वेषभाव आहे म्हणून अयोग्य न्याय देण्यास प्रवृत्त होऊं नका. योग्य न्याय देणें म्हणजे परमेश्वराविषयीं आदर प्रकट करणें होय. ”**

—पवित्र कुराण, ५ : ८

ज्या जातीच्या लोकांशीं आपले सलोख्याचे संबंध नाहींत, त्यांच्याविषयीं न्याय देते वेळीं आपलें मन अत्यंत निर्मळ ठेविलें पाहिजे. द्वेषभावानें प्रेरित होऊन पक्षपाती न्याय करणें म्हणजे न्याय-देवतेचा धडधडीत अपमान करणें होय. ज्या वेळीं आपण न्यायाचा तराजू आपल्या हातांत घेऊन बसतों त्या वेळीं आपण कोणत्याहि जातीचे, धर्माचे किंवा पक्षाचे नाहीं असें समजलें पाहिजे. त्या वेळीं आपला धर्म एकच, आपलें कर्तव्य एकच, आपलें ध्येय एकच आणि तें म्हणजे निःपक्षपाती न्याय हेंच होय. पक्षपात न करतां योग्य न्याय देणें म्हणजे परमेश्वराबद्दल आदर प्रकट करणें होय हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे.

**" निःपक्षपाती न्याय देणाऱ्या माणसांवर परमेश्वर प्रेम करतो."**

—पवित्र कुराण, ५:४२

व्यक्तिशः ज्यांनीं आपणांस दुखविलें आहे, ज्यांनीं आपला अपमान केला आहे किंवा ज्यांनीं आपलें उघड शत्रुत्व पत्करलें आहे अशा आपल्या कट्टया शत्रूंना न्याय देते वेळीं आपण अत्यंत निर्विकार राहिलें पाहिजे. अशा समयीं आपल्या मनाचा तोल जाऊं न देतां निःपक्षपाती न्याय देणारा गृहस्थ परमेश्वराच्या दृष्टीनें अत्यंत थोर समजला जातो.

**" गुन्हेगार लोकांची बाजू घेऊन भांडूं नका."**

—पवित्र कुराण, ४:१०५

गुन्हेगार लोकांची बाजू घेऊन भांडत बसण्यास कित्येकांना अभिमान वाटतो, पण हा अभिमान खोटा व मूर्खपणाचा आहे. एखाद्या मनुष्यानें गुन्हा केला आहे असें आपणांस ठाम माहीत असतां त्याची बाजू घेऊन त्यानें गुन्हा केला नाहीं असें सिद्ध करण्याचा प्रयत्न आपण कधींहि करूं नये. गुन्हेगार माणसांची बाजू घेणें म्हणजे अन्यायास मदत करण्यासारखें आहे. आपणांस न्यायाची चाड असेल तर गुन्हेगार लोकांविषयीं कसलीहि सहानुभूति दाखवून उपयोगी नाहीं.

त्याचप्रमाणें निरपराधी माणसांवर गुन्ह्याचा आरोप करणें हेंहि तितकेंच त्याज्य आहे. दुष्टाव्यानें किंवा वाईट हेतूनें निरपराधी माणसावर बालंट रचून त्याला संकटांत आणणें हा घोर गुन्हा आहे. पवित्र कुराणाच्या " अन्-निसा " या अध्यायांत निरपराधी माणसावर **" गुन्ह्याचा आरोप करणें महापाप आहे."** असा स्प केला आहे.

## सच्छीलता

> "परमेश्वराच्या दृष्टीनें सच्छील मनुष्य अत्यंत सन्माननीय समजला जातो."
>
> —पवित्र कुराण, ४९ : १३

सत्यप्रिय व न्यायी माणसाप्रमाणेंच सच्छील गृहस्थाची योग्यता फार थोर आहे. आपल्या पवित्र आणि आदर्शवत् आचरणानें तो बेताल झालेल्या जनतेस पायबंद घालतो, व्यसनामुळें हैराण झालेल्या समाजास व्याधि-मुक्त करतो, समाजांत बोकाळलेले अनाचार नष्ट करण्याची त्याची सदैव धडपड चालू असते. संकटांत सांपडलेल्या मानवजातीस सुख आणि शांति लाभावी अशी विवंचना त्याला लागलेली असते.

सत्कृत्य हें आपलें ध्येय आहे, असें सच्छील गृहस्थ समजतो. सत्कृत्य करीत राहून आपलें अंतःकरण निर्मळ ठेवण्याचा त्याचा सतत प्रयत्न चाललेला असतो. अंतःकरणांत किल्मिष ठेवून टिळेमाळा लावण्याचें किंवा चोवीस तास स्मरणी फिरविण्याचें वरपांगी ढोंग त्याला करतां येत नाहीं. लपून छपून कां होईना निशाबाजी, जुगार वगैरे व्यसनांचें अवलंबन करून, पुन्हां आपण सच्छील गृहस्थ आहोंत अशी त्याला जगाच्या डोळयांत धूळफेंक करतां येत नाहीं. कैफ आणणाऱ्या पदार्थांपासून किंवा जुगार, सट्टा वगैरे व्यसनांपासून तो चार हात दूर राहतो. इतकेंच नव्हे, तर मादक पदार्थ आणि जुगार यांमध्यें मानवांचा संहार करण्याची शक्ति आहे असें समजून त्या व्यसनांविषयीं चुकून देखील विचार त्याच्या मनांत येत नाहीं.

**"या दोन गोष्टींत ( निशा आणणाऱ्या चिजा आणि जुगार ) भयंकर पातक भरलेलें आहे; या दोन गोष्टी म्हणजे महापाप होय."**

—पवित्र कुराण, २ : २१९

सच्छील माणसाचा धर्म एकच आणि तो म्हणजे मानवांची सेवा होय. प्रत्येक मनुष्य, मग तो कुठल्याहि धर्माचा असो, कुठल्याहि पक्षाचा असो, त्याला सौख्य देणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे अशी त्याची उज्ज्वल विचारसरणी बनलेली असते. या विचारसरणीमुळें त्याच्या अंतःकरणाचा विकास झालेला असतो. त्याच्या आचारांत पावित्र्य आलेलें असतें. लबाडी, फसवणूक किंवा बदफैली वर्तन यांपासून तो सर्वस्वीं अलिप्त झालेला असतो. खोटें बोलून पोटाची खळगी भरण्यापेक्षां खरें बोलून उपाशी राहणें त्याला फार आवडतें. दुसऱ्यास मदत करून त्याचीं संकटें दूर करण्यांत त्याला फार धन्यता वाटते. पवित्र कुराणामध्यें सच्छीलपणाची नितांत सुंदर व्याख्या केली आहे.

**"...परमेश्वराकरितां आप्तेष्ट, गणगोत, अनाथ मुलें, कंगाल माणसें, पांथस्थ आणि गरीब भिक्षुक यांना पैशाची मदत करणें व तुरुंगांत दडपण्यांत आलेल्या असहाय बंदिवानांची सुटका करण्याकरितां पैसा खर्च करणें, म्हणजे सच्छीलपणा होय..."**

—पवित्र कुराण, २ : १७७

वरील सुंदर श्लोकांत मानवतेचें स्वच्छ प्रतिबिंब पडलेलें आपणांस दिसून येईल. सच्छीलपणा ही व्यक्तीपुरतीच बाब नसून त्याचा संबंध मानवांच्या कल्याणापर्यंत पोहोंचतो हें स्पष्ट आणि उघड आहे. आपल्या आप्तेष्टांपासून तों तहत रंजले-गांजलेल्या मानवजातीपर्यंत सच्छील माणसानें त्यांचीं दुःखें नष्ट करण्याकरितां मनोभावानें झटलें पाहिजे. अशा सच्छील माणसांकडूनच मानवांचा दुःखभार हलका होत असतो.

**" सच्छील माणसें स्वर्गाच्या नंदनवनांत राहतील आणि त्यांत कालक्रमण करतील. "**

—पवित्र कुराण, १० : २६

अशा सच्छील लोकांवर परमेश्वर मनापासून प्रेम करतो. इहलोकीं तर त्यांचा गौरव होतोच, पण परलोकीं त्यांना सद्गति मिळते. परमेश्वरानें त्यांच्याकरितां खास स्वर्गाचें नंदनवन राखून ठेविलें आहे. त्या ठिकाणीं त्यांचें आयुष्य अत्यंत समाधानांत जातें; त्यांना कशा-चीहि ददात पडत नाहीं. परलोकीं सौख्य मिळावें अशी इच्छा बाळग-णाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें आपलें आयुष्य अत्यंत सच्छीलपणें व्यतीत केलें पाहिजे.

**" सच्छील माणसांच्या सहवासांत रहा. "**

—पवित्र कुराण, ९ : १२०

चैनी, बेमुर्वतखोर आणि स्वार्थी माणसांच्या वाऱ्यास उभें न राहतां सच्छील माणसांच्या सहवासांत राहण्याची पवित्र कुराणाची आज्ञा आहे. सच्छील माणसांच्या सहवासांत राहणें याचा अर्थ स्वतः सच्छील

होण्यास शिकणें होय. इस्लाम धर्मांत सच्छील माणसाचा सहवास नच मिळाला तर एकटे रहा पण वाईट माणसांची संगत पत्करूं नका, असा उपदेश हजरत पैगंबरांनीं केला आहे.

> **“वाईट माणसांच्या संगतींत राहण्यापेक्षां एकटें स्वस्थ बसणें शतपटीनें चांगलें;....परमेश्वरा, आमचा व आमच्या मुलांबाळांचा, वाईट विचार, वाईट आठवणी आणि वाईट माणसें यांच्यापासून बचाव कर.”**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

आज आपल्या मनांत वाईट विचार येतील तर उद्यां त्या विचारांचें कृतींत रूपांतर व्हावयास फारसा वेळ लागत नाहीं; आणि आपल्या हातून वाईट कृति घडली कीं मनाचें पावित्र्य नष्ट होतें. यानंतर माणसाच्या हातून स्वार्थी व अनन्वित कृत्यें व्हावयास लागतात. वाईट विचार आणि वाईट कृती या सच्छीलपणास मारक आहेत, असें समजून त्यापासून अलिप्त राहण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

## सत्कृत्य

**" सत्कृत्य करणारांबरोबर परमेश्वर सदैव असतो."**

—पवित्र कुराण, २९ : ६९

सत्कृत्य करणें हा परमेश्वरप्राप्तीचा सीधा मार्ग आहे. जो नेहमीं सत्कृत्य करतो, त्याला परमेश्वर शोधण्याकरितां भटकावें लागत नाहीं किंवा उपासतापास करावे लागत नाहींत. सत्कृत्य हीच एक प्रकारची प्रार्थना आहे; हीच एक प्रकारची तपश्चर्या आहे. या सत्कृत्याच्या जोरावर तुम्ही परमेश्वरास प्रसन्न करूं शकतां. सत्कृत्य म्हणजे अनाठायीं दान नव्हे किंवा लोकांना दाखविण्याकरितां उभारलेला देखावा नव्हे. ज्या कृत्यापासून कोणाचाहि फायदा होत नाहीं त्यास सत्कृत्य म्हणतां यावयाचें नाहीं. मानवजातीस सुख देणें हें सत्कृत्याचें ध्येय असलें पाहिजे. या ध्येयास अनुसरून जितकीं कृत्यें आपण करूं तितकीं तीं सत्कृत्यांत जमा होऊं शकतील. सत्कृत्याचें मोजमाप आपणांस कधींच काढतां येणार नाहीं. अमुक दर्जाचें किंवा योग्यतेचें काम झालें म्हणजेच तें सत्कृत्य असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. एकाद्या श्रीमंत माणसानें दुष्काळपीडित अशा सबंध गांवास अन्न घालणें व एखाद्या गरीब माणसानें एखाद्या दुःखिताच्या व्रणावर फुंकर घालून त्याला आराम पोहोंचविणें या दोन्ही गोष्टी सत्कृत्यांत जमा होऊं शकतात.

**"सत्कृत्यें सतत करीत रहा व दुष्कृत्यांपासून आपणांस अलिप्त ठेवा."**

—हजरत महंमद पैगंबर.

एखादें सत्कृत्य केलें म्हणजे आपली कामगिरी झाली असें मात्र कोणीं समजूं नये. सत्कृत्यें हीं नेहमीं केलीं पाहिजेत, इतकेंच नव्हे, घटके-घटकेला तीं करावयाचीं असा आपण निश्चय केला पाहिजे. सत्कृत्य हें एक प्रकारचें पुण्य आहे. जितकीं आपण सत्कृत्यें करूं तितका आपल्याजवळ पुण्याचा सांठा होत जाईल. त्याचप्रमाणें दुष्कृत्यें आणि दुराचारी माणसें यांविषयीं आपण खबरदारी बाळगली पाहिजे.

**"परमेश्वरा, मला दुराचारी माणसांपासून वांचव."**

—पवित्र कुराण, २८ : २०

अशी प्रत्येकानें परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे. दुराचारी माणसाच्या आहारीं न जातां, त्याला सन्मार्गावर आणण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे. त्याच्या हातून दुष्कृत्यें होत असतील तर त्याला प्रसंगीं विरोध करून तीं दुष्कृत्यें होणार नाहींत अशी व्यवस्था केली पाहिजे. दुष्कृत्यांपासून किंवा दुराचारी माणसांपासून दूर राहून जगांतील दुष्कृत्यें होण्याची थांबणार नाहींत किंवा दुराचारी माणसांची पैदास व्हावयाची राहणार नाहीं. दुष्कृत्यांविषयीं उदासीन न राहतां तीं नेस्तनाबूद करण्याचा चंग बांधल्याखेरीज जगामध्यें शांतीचें वातावरण निर्माण होणें शक्य नाहीं.

" ज्या ज्या वेळीं दुष्कृत्य होतांना तुमच्या दृष्टीस पडेल त्या त्या वेळीं तुम्ही आपल्या हातानें तें थांबवा; तेंहि करण्याचें तुमच्या अंगांत सामर्थ्य नसेल तर वाणीनें त्याचा धिक्कार करा; असा धिक्कार करायाचें धाडस होत नसेल तर अंतःकरणपूर्वक त्याचा तिटकारा करा. पण अशा (नुसता तिटकारा करणाऱ्या) मनुष्यामध्यें धर्माची भावना कमकुवत आहे असें समजावें."

—हजरत महंमद पैगंबर.

शेवटचें वाक्य विचार करण्यासारखें आहे. दुष्कृत्याचा तिटकारा करणारा गृहस्थ कमकुवत असतो. कारण दुष्कृत्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य किंवा धिक्कार करण्याची हिंमत त्याच्या अंगीं नसते. पण दुष्कृत्य होत असतां निर्विकार चेहरा ठेवून शांतपणें बाजूला जाणाऱ्या माणसापेक्षां वरील कमकुवत पण तिटकारा करणारा गृहस्थ कितीतरी पटीनें चांगला यांत शंका नाहीं. दुष्कृत्याचें निर्दालन करण्याकरितां आपलें सामर्थ्य, आपला पैसा, आपलें वजन खर्चीं घालणारा मनुष्य इस्लाम-धर्माच्या दृष्टीनें अत्यंत श्रेष्ठ समजला जातो.

## प्रामाणिकपणा

**"अन्यायानें कोणाचीहि संपत्ति गिळंकृत करूं नका; किंवा अन्यायानें दुसऱ्याची संपत्ति मिळविण्याकरितां पंचांना लांच देऊं नका."**

—पवित्र कुराण, २ : १८८

मानवी जीवनास आवश्यक असणाऱ्या सद्गुणांमध्यें प्रामाणिकपणा हा एक श्रेष्ठ सद्गुण आहे. जनतेमधील अस्वस्थता कमी करून तिला चित्तस्वास्थ्य व आराम देणारा हा सद्गुण प्रत्येक व्यक्तीनें आचरणांत आणून दाखविला पाहिजे. बोलण्या-चालण्यांत प्रामाणिकपणा आवश्यक आहेच, पण कृतींत उतरवून दाखविल्याशिवाय तो कसाला लागत नाहीं. पैशाच्या व्यवहारांत तर तो तावून सुलाखून निघाला पाहिजे. संपत्ति किंवा पैसा याच्या मोहानें मी मी म्हणणाऱ्या किंवा प्रामाणिकपणाचा बाह्य देखावा करणाऱ्या सद्गृहस्थांची तिरपीट उडून तो नेमका दगलबाजीच्या भक्ष्यस्थानीं पडतो. पैशाचा मोह आवरला कीं आपण प्रामाणिकपणाला जिंकलें असें समजावयास हरकत नाहीं.

ज्या संपत्तीवर आपला हक्क नाहीं अशी संपत्ति लुबाडण्याची बुद्धि आपण कधींहि बाळगूं नये. वाटेल तसा बादरायण संबंध जोडून आपण दुसऱ्यांची संपत्ति गिळावयाचा बेत करूं तर जगांत आपण अप्रामाणिक ठरूं. दुसऱ्यांच्या मिळकतीवर डोळा ठेवणें हा अन्याय आहे. त्याचप्रमाणें ती मिळकत लांच म्हणून आपण अधिकाऱ्यांना

देण्याचा प्रयत्न कधींहि करूं नये. लांच देणें हा अक्षम्य गुन्हा आहे. ज्या अधिकाऱ्यांना आपण लांच देतों ते आपले मिंधे बनतात, आणि आपणांस पुन्हां दुसऱ्याची संपत्ति गिळंकृत करण्यास चांगली सवड सांपडते. आपण प्रामाणिक असावें अशी सद्‌बुद्धि बाळगणारानें अशा प्रकारापासून चार हात दूर राहिलें पाहिजे.

**"तुमच्याजवळ असलेल्या ठेवी ज्याच्या त्यांना परत करा, अशी परमेश्वर तुम्हांस आज्ञा करीत आहे."**

—पवित्र कुराण, ४:१६१

लोकांनीं विश्वासानें आपल्याजवळ ठेवावयास दिलेल्या ठेवी आपण इमानानें ज्यांच्या त्यांना परत केल्या पाहिजेत. अशा ठेवींचा आपण अपहार करूं तर परमेश्वराच्या घरचे आपण अपराधी ठरूं. दुसऱ्यांच्या ठेवी परत करणें म्हणजे आपण अत्यंत विश्वासू आणि प्रामाणिक आहोंत हें सिद्ध करणें होय.

त्याचप्रमाणें दुसऱ्याचें आपण कर्ज काढलें असेल तर ते कर्ज अगोदर भागविण्याची तजवीज केली पाहिजे. मनुष्य दुसऱ्याचे पैसे वेळेवर आणतो, पण ते पैसे परत करण्याची त्याला बुद्धि होत नाहीं. शक्य तों पैसे बुडविण्याची त्याची प्रवृत्ति असते. या नीच प्रवृ-तीचा इस्लाम-धर्मांत अत्यंत कडक शब्दांत धिक्कार केला आहे.

**"जोंपर्यंत त्यांनीं दुसऱ्याचें कर्ज भागविलें नाहीं तोंपर्यंत त्यांना सदाचारी कधींहि म्हणतां येणार नाहीं आणि स्वर्गांत प्रवेश करतां येणार नाहीं."**

—हजरत महंमद पैगंबर.

आपण चांगल्या आचरणाचे सद्गृहस्थ आहोंत हें सिद्ध करावयाचें असेल तर असेल तें कर्ज भागविण्याची प्रामाणिक बुद्धि पाहिजे. दुसऱ्याचे पैसे बुडविण्याचे विचार तुमच्या मनांत आले कीं तुमच्या चांगुलपणाला ग्रहण लागलेंच म्हणून समजावें. दुसऱ्याचे कर्जाऊ पैसे बुडविणारा इसम कितीहि सभ्यतेनें समाजांत वावरूं लागला तरी त्याची कदर कधींहि होणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर दुसऱ्याचें कर्ज न देतां किंवा त्याची व्यवस्था न करितां एखादा मनुष्य मेला तर त्याला स्वर्गाचें द्वार कधींहि खुलें असणार नाहीं, असा इस्लाम-धर्मानें इशारा दिला आहे.

**“चांगला जिन्नस आणून त्याचा बदला म्हणून वाईट जिन्नस देऊं नका.”**

—पवित्र कुराण, ४ : २

पैशाखेरीज साध्या व्यवहारांत देखील मनुष्यानें प्रामाणिकपणा दाखविला पाहिजे. एखाद्याच्या घरून आपण एकादी वस्तु आणली आणि ती हरवली तर बदला म्हणून तितक्याच किंमतीची वस्तु त्या गृहस्थास नेऊन दिली पाहिजे. तितक्याच किंमतीची वस्तू परत करावयाचें आपल्यांत सामर्थ्य नसेल तर असली वस्तु आपण नेऊंच नये हें उत्तम. पण नेल्यानंतर त्याच आकाराची पण किंमतींत कमी अशी वस्तु देतां उपयोगी नाहीं. कित्येकांना तर अशी कायमची खोड लागलेली असते. दुसऱ्याकडून कांचेची सुंदर दौत न्यावयाची व फुटली म्हणून ओबडधोबड चिनी मातीची दौत बदला म्हणून परत करावयाची. कांहींजण तर अशी दौत लपवून ठेवून दुसरी हलक्या

किंमतीची दौत बदला म्हणून परत करण्याचा निर्लज्जपणा बिनदिक्कत दाखवितात. जिनसांच्या किंमतीचें महत्त्व नाहीं, पण अशा तऱ्हेची हीन मनोवृत्ति प्रामाणिकपणास घातक असते म्हणून तिचा त्याग करावयाचा एवढेंच.

**" मजुराचा घाम वाळावयाच्या आंत त्याचा मेहनताना देऊन टाका. "**

—हजरत महंमद पैगंबर.

मजुराचा जो मेहनताना ठरला असेल त्यांत काट न करितां तो ताबडतोब देऊन टाकणें हाही एक प्रकारचा प्रामाणिकपणा आहे. मजुराकडून मरेमरेतों काम करून घ्यावयाचें आणि मेहनताना देतांना त्यास सारखे हेलपाटे घालावयास लावावयाचें अशा मनोवृत्तीचा इस्लामधर्मांत धिक्कार केला आहे. हा प्रामाणिकपणा नव्हे, तर प्रामाणिकपणाची गळचेपी आहे, हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे.

**"एकदां तुम्ही वचनबद्ध झालांत म्हणजे आपलें वचन मोडूं नका."**

—पवित्र कुराण, १६ : ९१

आपण दुसऱ्यास दिलेलें वचन पाळणें हा एक श्रेष्ठ प्रकारचा प्रामाणिकपणा आहे. एखादी गोष्ट करण्याचें सामर्थ्य आपल्यांत नसेल तर आपण वचन देण्याच्या भानगडींत पडूं नये. पण एकदां का वचन आपण दिलें तर तें पाळण्याकरितां आपण आपल्या जिवाची देखील पर्वा करितां कामा नये. वचन म्हणजे क्षणांत हवेंत विरणारे पोकळ शब्द नसून ती एक परमेश्वराजवळ घेतलेली शपथ आहे.

भरपूर काम करून घेऊन मजुराला वेतन न देणें, हिशेबांत फसवाफसवी करणें, खोटेंनाटें सांगून लोकांना ठकविणें, दुसऱ्यानें विश्वासपूर्वक ठेवावयास दिलेली वस्तु बळकावून बसणें, अनाथ व गरीब लोकांच्या इस्टेटी गिळंकृत करणें व दिलेल्या वचनांचा भंग करणें हे सर्व प्रकार प्रामाणिकपणाच्या नरडीस नख देणारे आहेत. अशा प्रकारांना दगलबाजी ही संज्ञा आहे. इस्लाम-धर्मानें या दगलबाजीचा निषेध केला आहे.

**"परमेश्वर दगलबाज माणसावर प्रेम करीत नाहीं."**

—पवित्र कुराण, ६ : ६०

परमेश्वरास न आवडणाऱ्या दगलबाजीपासून प्रत्येक सद्गृहस्थानें अलिप्त राहून, प्रामाणिकपणाचा अंगिकार करावयास शिकलें पाहिजे.

## सभ्यता

**“मणभर धान्याचा दानधर्म करण्यापेक्षां आपल्या मुलास सभ्यता शिकविणें अधिक चांगलें आहे.”**

—हजरत महंमद पैगंबर.

इस्लाम-धर्मांत दानधर्माचें महत्त्व मोठें आहे, पण त्याहून सभ्यतेचें महत्त्व किती अधिक आहे हें वरील वाक्यावरून स्पष्टपणें दिसून येईल. दानधर्माचा हेतु परोपकार आहे, तर सभ्यतेचा हेतु आपल्या वागणुकीनें दुसऱ्याला प्रसन्न करणें हा आहे. आपल्या सान्निध्यांत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या अंत:करणास आल्हाद देणें हा एक प्रकारचा परोपकारच आहे. दानधर्म करून फक्त गोरगरिबांनाच आपण तोषवूं, पण सभ्यतेचा धर्म पाळून गरीब श्रीमंत, लहान थोर, हीनदीन अशा सर्व प्रकारच्या लोकांना प्रसन्न करूं शकूं. अशा सभ्यतेचा धर्म आपल्या मुलास शिकविणें म्हणजे जगामध्यें एक अत्यंत मोठें पुण्यकर्म करणें आहे, असें प्रत्येक बापानें समजलें पाहिजे. आपल्या बेछूट, उद्धट आणि मूर्खपणाच्या वागणुकीनें दुसऱ्यांचीं अंत:करणें दुखविणाऱ्या मुलाचा दानशूर बाप म्हणून मिरविण्यापेक्षां, आपल्या सभ्य वागणुकीनें सर्वांस संतोषित करणाऱ्या सुसंस्कृत मुलाचा कफल्लक बाप म्हणून राहणें अधिक मोलाचें आहे.

मनुष्य सुसंस्कृत आहे हें जाणण्याची ढोबळ खूण म्हणजे त्या मनुष्याच्या अंगीं बाणलेली सभ्यता होय. मनुष्याच्या बोलण्या-

चालण्यांत, वागण्यांत, कृतींत जी उदार वृत्ति दिसून येते, जी शिष्टता दृष्टीस पडते, तिलाच आपण सभ्यता असें समजतों. मनुष्याची दृष्टि किती विस्फारित आहे, मनुष्याच्या अंत:करणाचा किती विकास झाला आहे हें त्याच्या सभ्यतेवरून चटकन सांगतां येतें. सभ्यतेला वरपांगी सोंग करतां येत नाहीं. नुसता झकपक पोषाख करणें, मोजकें बोलणें किंवा चित्रासारखें वागणें या केवळ बाह्य देखाव्यास सभ्यता म्हणतां येणार नाहीं. मनुष्याच्या अंत:करणाशीं समरस होऊन त्याच्या वागणुकींतून प्रकट झाल्याशिवाय सभ्यतेला अस्तित्व प्राप्त होत नाहीं. अशा तऱ्हेची वागणूक कशी असावी लागते हेंच आपणांस पाहावयाचें आहे.

**" त्यांना खरे शब्द बोलूं द्या."**

—पवित्र कुराण, ४ : ९

मनुष्याच्या बोलण्यावरून त्याच्या सभ्यतेचा सर्वसाधारण अंदाज लावतां येतो. सभ्य गृहस्थ नेहमीं खरें बोलत असतो; त्याला खोटें बोलून लोकांची दिशाभूल करावयाची कला माहीत नसते. प्रसंग पडेल तर तो एखादे वेळीं स्तब्ध बसेल; पण खोटें बोलावयाचें धाडस त्याच्या हातून कधींहि होणार नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्याचें मन दुखेल अशी कठोर भाषाही पण तो कधीं बोलणार नाहीं. लोकांना वाटेल तसें टाकून बोलणाऱ्या माणसाची इस्लाम धर्मात कदर नाहीं.

**" लोक त्याच्याशीं फटकून वागतील अशा प्रकारची कठोर भाषा वापरणारा मनुष्य परमेश्वराच्या दृष्टीनें अत्यंत वाईट होय."**

—हजरत महंमद पैगंबर.

पैशाच्या किंवा अधिकाराच्या मदानें धुंद होऊन गोरगरिबांस वाटेल तें अद्वातद्वा बोलणाऱ्या मनुष्यास अंतःकरणच नसतें. आज आपण या गृहस्थास वाटेल तसें बोललों तर हा गृहस्थ आपणाशीं फटकून वागेल या गोष्टीचा त्याला विधिनिषेधच वाटत नाहीं. असा गृहस्थ सभ्य म्हणविण्यास मुळींच पात्र होत नाहीं.

**" धर्मकृत्यांनीं शिवीगाळ करण्याचें पाप भरून येत नाहीं. "**

—हजरत महंमद पैगंबर.

त्याचप्रमाणें तोंडाला येईल त्या शिव्या देणाऱ्या गृहस्थास सभ्य गृहस्थ म्हणणें धाडसाचें ठरेल. आपल्या तोंडून शिवी काढणें म्हणजे परमेश्वरानें आपल्यास जी वाणी दिली आहे तिचा दुरुपयोग करणें होय. शिवीगाळ करण्याचें पाप इस्लाम धर्मांत तर फार मोठें समजलें जातें. नेहमीं शिवीगाळ करणाऱ्या गृहस्थानें धर्मकृत्यांचा वाटेल तेवढा सोहाळा केला तरी त्यामुळें शिवी दिल्याचें पाप भरून निघत नाहीं.

**" लोकांना हितकारक वाटेल असेंच बोला. "**

—पवित्र कुराण, २ : ७७

सभ्य माणसाच्या भाषणानें ऐकणारास आनंद वाटला पाहिजे. त्याच्या तोंडांतून बाहेर पडणारे हितकारक शब्द ऐकून आज आपणांस खरा हितचिंतक भेटला अशी ऐकणाऱ्याची कल्पना झाली पाहिजे. त्याच्या शब्दांशब्दांतून मानवजातीच्या हिताची किंवा कल्याणाची छटा दिसून आली पाहिजे. अशा तऱ्हेचे सुमधुर, हितकारक आणि खरे शब्द बोलणारास सभ्य गृहस्थ म्हणतां येईल.

सभ्य गृहस्थाच्या भाषणांत बढाया किंवा फुशारक्यां आपणांस कधींच दिसून येणार नाहींत. बढाया किंवा फुशारक्या मारणारा गृहस्थ मूर्ख किंवा कमअक्कल समजला जातो.

**" परमेश्वर स्वयंनिर्मित फुशारक्या मारणाऱ्या गृहस्थावर प्रेम करीत नाहीं."**

—पवित्र कुराण, ३१ : १८

स्वयंनिर्मित बढाया मारणें म्हणजे लोकांची फसवणूक करणें होय. अशा तऱ्हेची फसवणूक करून मोठेपणा मिळविण्याची ही पद्धत त्याज्य व निषेधार्ह आहे. अशी फसवणूक सभ्य म्हणविणारा गृहस्थ कधींच करणार नाहीं.

खोटें बोलणें, लोकांचीं मनें दुखतील अशी भाषा वापरणें, बढाया मारणें या गोष्टी मानवांची फसवणूक करणाऱ्या व त्यांना दुखविणाऱ्या असल्यामुळें इस्लाम-धर्मानें त्यांचा कडक शब्दांत निषेध केला आहे. इस्लाम-धर्माचा अभिमान बाळगणाऱ्यांनीं अशीं भाषणें करण्यापासून अलिप्त राहिलें पाहिजे.

**" भाषणाचें आणि विचाराचें पावित्र्य म्हणजेच धर्म होय."**

—हजरत महंमद पैगंबर.

इस्लाम धर्मात भाषणाचें किती पावित्र्य आहे हें वरील सुंदर वाक्यावरून वाचकांच्या लक्षांत यावयास फारसा वेळ लागणार नाहीं.

भाषणाप्रमाणें विचाराचें पावित्र्य आपण ठेवलें पाहिजे. भाषण व विचार यांचा फार निकट संबंध आहे. भाषणामध्यें पावित्र्य यावें

अशी सदिच्छा बाळगणाऱ्यांनीं आपल्या मनांत अपवित्र विचार येऊं देतां कामा नये. ज्यांच्या मनांत अपवित्र विचार धिंगाणा घालीत आहेत त्यांच्याकडून वाणीचें पावित्र्य कदापिहि सांभाळलें जाणार नाहीं. विचाराचा स्फोट भाषणद्वारें होत असतो. विचाराचें पावित्र्य भाषणाच्या योगें कळून येतें. जिथें विचारच अपवित्र व ओंगळ तिथें भाषणाच्या पावित्र्याची अपेक्षा करणें चुकीचें ठरेल. सभ्य म्हणविणाऱ्या गृहस्थांनीं विचारपावित्र्य कायम टिकविलें पाहिजे.

**"खोटें बोलणें, वचन दिलें असतां तें न पाळणें, विश्वास ठेवणाऱ्याशीं बेइमान होणें हीं ढोंगीपणाचीं चिन्हें आहेत."**

—हजरत महंमद पैगंबर.

ज्यांना भाषण आणि विचारपावित्र्य टिकवितां येत नाहीं, त्यांना सभ्य न म्हणतां ढोंगी म्हणावें लागेल. ढोंगी माणसाला भाषणपावित्र्याची योग्यता कळून न आल्यामुळें त्याला खोटें बोलावयाची लाज वाटत नाहीं. जगाची किंवा मनाची पर्वा न करतां तो बेधडक खोटें बोलत सुटतो. त्याचप्रमाणें त्याच्या अंतःकरणांत दुष्ट आणि अपवित्र भावनांचा हैदोस चालल्यामुळें विचारपावित्र्याचें मधुर संगीत कुठच्या कुठें लुप्त होऊन जातें. अशा माणसास वचनभंग करणें किंवा बेइमान होणें यांत कांहींच पाप वाटत नाहीं. ज्याला चांगलें वाईट, पाप-पुण्य यांचा विधिनिषेध नाहीं त्याला सभ्य गृहस्थ ठरविणें म्हणजे आपल्या अकलेचें प्रदर्शन करणें होय.

गर्विष्ठपणापासून सभ्यतेला फार दूर राहिलें पाहिजे. गर्वामुळें मनुष्य उन्मत्त व्हावयाचा संभव असतो आणि उन्मत्तपणा हा तर

सभ्यतेला वावडा आहे. सभ्य माणूस हा विचारवंत समजला जातो; त्याच्या वागणुकींत प्रेमळपणाचा ओलावा सांपडतो; त्याच्या कृतींत औदार्य दिसून येतें. उन्मत्तपणाची वागणूक याच्या अगदीं उलट असते. उन्मत्त माणसास विचार कशाशीं खातात हें माहित नसतें; त्याच्या वागणुकींत मग्रूरपणाचा उग्रट वास दरवळत असतो; त्याच्या कृतींत दुष्टपणाचा घनदाट अंधार दिसून येतो. या उन्मत्तपणाचा जन्म गर्वापासून होतो, म्हणून गर्व निषिद्ध मानला आहे.

> **"गर्विष्ठ आणि बढाईखोर माणसांवर परमेश्वर कधींच प्रेम करीत नाहीं."**
>
> —पवित्र कुराण, ४ : ३६

परमेश्वरास प्रसन्न करून घ्यावयाचें असेल तर गर्विष्ठपणाचा त्याग करून लीनतेचा अंगीकार केला पाहिजे. लीनता मनुष्याचा बहुमोल अलंकार आहे. धीरगंभीरता किंवा अंतःकरणाची विशालता ही लीनते-मधून प्रतीत होत असते. लहानसहान किंवा क्षुल्लक कारणावरून नम्र मनुष्याच्या मनाची गंभीरता ढळत नाहीं किंवा मानपत्राच्या खोट्या कल्पना उराशीं बाळगून तो आकांडतांडव करीत नाहीं.

> **"क्षुल्लक कारणाकरितां चाललेला वादविवाद न ऐकतां तेथून निघून जाऊन मनाचा मोठेपणा प्रदर्शित करतात."**
>
> —पवित्र कुराण, २५ : ७२

क्षुल्लक वादविवादावरून निष्कारण भांडणें उपस्थित होतात किंवा बाचाबाची होते म्हणून अशा तऱ्हेच्या वादविवादांत भाग न घेतां

सभ्य गृहस्थ शांतपणें तेथून निघून जातात. अशा तऱ्हेच्या वादविवादांत त्यांना अपशब्द ऐकावे लागले तरी त्यांच्या अंतःकरणाची शांति भंग पावत नाहीं. त्याचप्रमाणें त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला तरी मोठेपणाचा दर्प त्यांना शिवत नाहीं किंवा हजारों रुपये त्यांच्यासमोर ओतले तरी मनाची वृत्ति बदलत नाहीं. गर्विष्ठ माणसाच्या अंतःकरणास खळबळणाऱ्या उथळ ओढ्याची उपमा दिली तर लीन मनुष्याच्या अंतःकरणास अथांग सागराची उपमा द्यावी लागेल.

> **" जगामध्यें लीनतेनें चालणारे आणि मूर्खांची बडबड शांतपणें ऐकून घेणारे परमेश्वराचे खरे सेवक असतात. "**
>
> —पवित्र कुराण, २५ : ६३

लीनतेनें वागणाऱ्या अशा सदगृहस्थांच्या हातूनच मानवतेची सेवा नेहमीं होत असते. सर्व जग आपल्याकरितां आहे ही स्वार्थी कल्पना त्यांच्या उदार अंतःकरणाला पटतच नाहीं. उलट आपलें अस्तित्व, आपलें जीवित, आपली संपत्ति ही जगाकरितां आहे अशा उदात्त ध्येयाचा पुरस्कार त्यांच्याकडून होत असतो. अशा लीन माणसासच खरा सभ्य गृहस्थ म्हणणें अधिक शोभून दिसेल.

सोज्ज्वल अंतःकरण कलंकित करून टाकणाऱ्या एका महान् शत्रूपासून सभ्य गृहस्थानें चार हात दूर राहिलें पाहिजे. जगामध्यें हा शत्रु संशय या नांवानें धिंगाणा घालीत असतो. आरशासारख्या स्वच्छ मनावर डांबर फासून तें काळेंकुट्ट करून टाकणें, सामर्थ्यवान् भावना निःसत्त्व करून सोडणें, मनुष्याची उदात्त विचाराशीं ताटातूट करून

त्याला रागाच्या आणि द्वेषाच्या खाईत लोटणें, गोड आणि सुखाच्या संसाराची धूळधाण करून टाकणें, प्रेमी जीवनावर निखारे पसरून ते जाळून खाक करणें, हीं सारीं पुण्य(?)कार्यें संशयपिशाच्चाकडून चुटकीसारखीं होतात.

**" संशय पाप असल्यामुळें त्यापासून अलिप्त रहा. "**

—पवित्र कुराण, ४९ : १२

संशय हें पाप फार मोठें आहे, असें याच कारणाकरितां इस्लाम धर्मानें सांगितलें आहे. पापामुळेंच जगाच्या मांगल्याचा नाश होत असतो. पापामुळेंच मानवतेची दुर्दशा होत असते. आतांपर्यंत करण्यांत आलेली पापाची लवचिक कल्पना या ठिकाणीं संमत नाहीं. उच्च जातीनें हलक्या जातीशीं सहभोजन करणें किंवा परधर्मीयांशीं प्रेमानें वागणें म्हणजे पाप नव्हे. ज्यामुळें मानवजातींत दुःख होईल अशा अन्यायास किंवा असत्यास पाप ही संज्ञा आहे.

**" संशय याचा अर्थ धादांत असत्य होय. "**

—हजरत महंमद पैगंबर.

ज्या असत्यामुळें किंवा अन्यायामुळें मानवसुखाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात अशा असत्यास किंवा संशयास दूर ठेवणें यांतच मानवांचें कल्याण आहे.

संशयास अंत:करणांत थारा मिळाला कीं तो द्वेषास आमंत्रण देतोच. संशय आणि द्वेष यांची जोडी जमली कीं, मनुष्याच्या अधः-पतनाचें कार्य त्यांच्याकडून ताबडतोब होतें. या जोडीला मनुष्याच्या विचारशक्तीस अंधत्व आणावयास फारसा वेळ लागत नाहीं. विचारी

माणसानें संशयाप्रमाणेंच द्वेषाला आपल्या अंतःकरणांतून हद्दपार केला पाहिजे.

**" दुसऱ्याचा द्वेष करूं नका. "**

—हजरत महंमद पैगंबर.

दुसऱ्याचा द्वेष करण्यानें मनुष्याच्या सद्भावना गढूळ होतात, त्याची दृष्टि अंध बनते. त्याला दुसऱ्याची कर्तबगारी, योग्यता किंवा सद्गुण दिसत नाहींत. प्रतिस्पर्ध्याच्या थोरपणाचा काडीमात्र विचार न करतां तो त्यांच्यावर वाटेल तसें तोंडसुख घेऊं लागतो, त्याच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवूं लागतो. वेळ प्रसंग पडला तर सूड घ्यावयास देखील मागेंपुढें पाहत नाहीं. अशा वेळीं त्याची अवस्था पशूसारखी झालेली असते. त्याला मनुष्यत्वाची जबाबदारी कळत नाहीं. दया, प्रेम किंवा आदर या सद्गुणांचा त्याला विसर पडून तो निर्दयपणें वागत असतो. अशा प्रकारच्या त्याच्या वागणुकीमुळें एके काळीं त्यानें केलेल्या सत्कृत्यावर माती पडते, त्याचे पराक्रम तुच्छतेच्या मापानें मोजले जातात.

**" ज्याप्रमाणें विस्तव लांकडास जाळून टाकतो, त्याप्रमाणें द्वेष सत्कृत्याचा नाश करतो; म्हणून द्वेषापासून अगदीं अलिप्त रहा. "**

—हजरत महंमद पैगंबर.

मनुष्यानें केलेलीं सत्कृत्यें किंवा पराक्रम यांचें महत्त्व टिकवावें लागतें. आज आपण एखादें सत्कृत्य केलें आणि उद्यां आपण दुसऱ्या कारणासाठीं बदमाष ठरलों तर पहिल्या केलेल्या सत्कार्याच्या जोरावर

आपण साव कधींहि ठरणार नाहीं, किंवा तें सत्कार्य हा आपल्या थोरपणाचा पुरावा आहे असें आपणांस कधींच म्हणतां येणार नाहीं. उलट अलीकडच्या बदमाष वृत्तीमुळें मागें केलेल्या सत्कार्याचें महत्त्वहि पण जातें. सत्कार्याचें महत्त्व टिकवावयास, तशा सच्छील वृत्तीनेंच मनुष्यानें राहिलें पाहिजे. दुसऱ्याचा द्वेष करणाऱ्या माणसानें ही गोष्ट अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे.

संशय आणि द्वेष यांमुळें मानवजातीचें अत्यंत नुकसान झालें आहे, या जोडगोळीनें मानवांच्या सुखाकरितां केलेले अनेक प्रयत्न निष्फळ करून टाकले आहेत, अनेक कर्तबगार लोकांच्या कर्तृत्वाची माती करून टाकली आहे.

> **" द्वेष आणि संशय यांनीं समाजाचे तुकडे तुकडे केले आहेत. "**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

संशय आणि द्वेष यांच्या संयोगशक्तीनें समाज उध्वस्त केले आहेत, राज्यें रसातळाला मिळविलीं आहेत. जगाच्या इतिहासाचें परिशीलन केलें तर असे अनेक भीषण प्रसंग जागोजागीं विखुरलेले दिसतील. मानवजातीच्या कल्याणाकरितां तळमळणाऱ्या मानव-सेवकांनीं या शक्तीचा उच्छेद करावयास शिकलें पाहिजे.

सभ्यतेला काळिमा आणणारा मनुष्याचा मोठा दुर्गुण म्हणजे निंदा करण्याचा त्याचा स्वभाव. इस्लाम-धर्मांत निंदकांचा किंवा कुचेष्टेखोरांचा अत्यंत कडक शब्दांत निषेध केला आहे. निंदकाला आपल्या शेजारींच काय पण जवळपास देखील उभा करूं नये.

लोकांची निंदा करून त्याची मनोवृत्ति नीच बनलेली असते. वाटेल त्या सद्‌गृहस्थावर शिंतोडे उडवावयास हा नीच गृहस्थ नेहमीं तयार असतो. अशा नीच आणि बदमाष माणसाचा संपर्क होऊं देतां कामा नये.

**" निंदा करणाऱ्या व बदनाम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा धिक्कार असो. "**

—पवित्र कुराण, १०४ : १

लोकांची नुसती निंदा करूनच निंदक गप्प बसत नाहीं, तर लोकांवर खोटेनाटे आरोप करून त्यांना बदनाम करावयास तो नेहमीं तयार असतो. मनुष्याच्या मोकळ्या आचरणाचा गलिच्छ गोष्टींशीं बादरायण संबंध लावून तो वाटेल त्या कंड्या पिकवीत सुटतो. विशेषतः निष्पाप स्त्रियांची बदनामी करतांना तर त्याला एक प्रकारचें स्फुरणच चढतें. एका सुशील स्त्रीची बदनामी केली कीं आपण एक मोठी लढाई जिंकली या भावनेनें तो बेशरमपणें बरळत सुटतो. स्त्रियांची नालस्ती करतांना त्याला पुरावे गोळा करण्याचें कारणच पडत नाहीं. एखादी स्त्री मोकळेपणानें एखाद्याशीं बोलली किंवा हंसली कीं बस्स ! त्या स्त्रीचें वर्तन आक्षेपार्ह ठरवून ती अनीतिमान् म्हणून डांगोरा पिटीत सुटतो. वास्तविक त्या बाईची याला ओळख ना देख. तिची चांभार-चवकशी करण्याचें किंवा तिच्या शिरावर बदनामीचें खापर फोडण्याचें याला कांहींच कारण नसतें. पण निंदकाला ओळखीची जरूरी भासत नाहीं. दृष्टिपथांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीची बदनामी करणें हेंच आपलें कर्तव्यकर्म असें तो समजतो. प्रेमळ, सालस आणि हळुवार

अंतःकरणाच्या स्त्रियांची नाहक बदनामी करणाऱ्या गृहस्थास अव्वल दर्जाचा नीच व बदमाष समजून त्याला खड्यासारखा वगळून ठेवला पाहिजे.

**" एकाद्याची गुप्तपणें चवकशी करूं नका किंवा त्याच्या पाठीमागें निंदा करूं नका. "**

—पवित्र कुराण, ४९ : १२

एखाद्या सद्गृहस्थाचें बिंग शोधण्याकरितां, त्याच्या वर्तनाची गुप्तपणें चवकशी करण्याची निंदकांना खोडच लागलेली असते. त्या सद्गृहस्थाच्या ओळखीच्या स्नेहीमंडळींना भेटून मुद्दाम त्यांची ओळख काढून त्या गृहस्थाची बारीक चवकशी करण्याचा निंद्य प्रयत्न ते करीत असतात. अशा तऱ्हेची हीन व दुष्ट मनोवृत्ति प्रदर्शित करणारे उद्योग इस्लाम-धर्मानें निषेधार्ह ठरविले आहेत. त्याचप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या पाठीमागें निंदा करणें त्याज्य ठरविलें आहे.

एखाद्या व्यक्तीच्या हातून चुकत असेल तर प्रामाणिकपणानें त्याची चूक दाखवून त्याला सुधारण्याचा प्रयत्न करावा. पण त्या व्यक्तीच्या गैरहजरींत ती चूक चारचौघांपुढें मांडून त्याची निंदा करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न करूं नये. एखाद्या व्यक्तीची पाठीमागें निंदा करणें हा एक प्रकारचा भ्याडपणा आहे. ज्या व्यक्तीला समोरासमोर बोलण्याचें धाडस होत नाहीं अशी व्यक्तिच पाठीमागें निंदा करण्याचा उपक्रम सुरू करते. या भ्याडपणाबरोबर दुष्टपणाहि असतोच. मनुष्य दुसऱ्याची चूक दाखवून गप्प बसत नाहीं, तर त्या चुकीवर आपलें भाष्य रचून चूक करणाराची मनसोक्त निंदा करतो.

**" लोकांचे दोष काढीत बसूं नका किंवा टोपण-नांवानें हिणवूं नका."**

——पवित्र कुराण, ४९ : ११

दुसऱ्याचे दोष काढीत बसणें ही एक प्रकारची निंदाच आहे. जरी दुसऱ्यावर आरोप किंवा नालस्ती न करतां त्याचे नुसते दोष दाखविले तरी दोष दाखविणारा निंदक ठरूं शकतो. कारण दोष दाखविण्यांत त्याचा प्रामाणिक हेतु कधींच असत नाहीं. दोष दाखवून तो किती नालायक आहे हें त्याला दाखवावयाचें असतें. दुसऱ्यांचे दोष काढणें ही गर्भित निंदाच आहे. अशाच तऱ्हेची निंदा म्हणजे दुसऱ्यांना टोपणनांवानें हिणवणें होय. शारीरिक व्यंगावरून दुसऱ्यास टोपणनांवानें बोलावणें म्हणजे त्याच्या शारीरिक व्यंगाची अवहेलना करण्यासारखें आहे. शारीरिक व्यंग हें परमेश्वरनिर्मित किंवा प्रसंग-निर्मित असतें; त्यामध्यें त्या मनुष्याचा कांहींच दोष नसतो. अशी वस्तुस्थिति असतां त्या गृहस्थास टोपणनांवानें हांक मारणें सभ्यतेला सोडून आहे. हात तुटलेल्या माणसास 'थोट्या' म्हणून हांक मारणें, कृष्ण-वर्ण असलेल्यास 'काळ्या' म्हणून संबोधणें या गोष्टी शिष्ट-संमत नाहींत. ज्यांना टोपणनांवानें आपण हांक मारतों, त्यांना त्या-बद्दल किती वाईट वाटतें याची कल्पना आपणांस नसते. निष्कारण दुसऱ्यांचा जीव दुखवणें हें मानवतेच्या ध्येयास सोडून आहे.

व्यक्तीप्रमाणें समाजाची, पक्षाची किंवा धर्माची निंदा अथवा उपहास करणें निंद्यपणाचें आहे. एका समाजानें दुसऱ्या समाजाचे दोष दाखवावे, एका जातीनें दुसऱ्या जातीची अवहेलना करावी,

एका धर्मानें दुसऱ्या धर्माबद्दल उपहास दर्शवावा या गोष्टी तिरस्करणीय आहेत. अशा वृत्तीमुळें दुसऱ्यांचीं मनें निष्कारण दुखविलीं जाऊन आपआपसांत तेढ उत्पन्न होते. निरनिराळ्या समाजांत किंवा धर्मांत जें हाडवैर माजलें आहे त्याचें कारण एकमेकांनीं केलेली निंदा, उपहास किंवा गालिप्रदान होय. राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीनें किंवा मानवजातीच्या सौख्याच्या दृष्टीनें अशा प्रकारांना अवश्यमेव आळा घातला पाहिजे.

> **"एका जातीनें दुसऱ्या जातीचा उपहास करूं नये. कदाचित् दुसरी जात त्या जातीपेक्षांहि श्रेष्ठ असूं शकेल."**
>
> —पवित्र कुराण, ४९ : ११

दुसऱ्या जातीचें महत्त्व कमी करण्याकरितां किंवा अवहेलना करण्याकरितां आपण दुसऱ्या जातीचा उपहास करण्याचा निंद्य प्रयत्न करतों. पण उपहास केलेली जात, आपल्यापेक्षांहि श्रेष्ठ असण्याचा संभव आहे. याकरितां दुसऱ्या जातीचा उपहास किंवा निंदा करूं नका, असा दंडक घालून इस्लाम-धर्मानें अभूतपूर्व अशा सहिष्णुतेचा व उदार वृत्तीचा साऱ्या जगास धडा घालून दिला आहे.

व्यक्तीला दुखविण्यापासून तों समाजांत किंवा राष्ट्रांत कलागती लावून द्वेषभाव व वैर वाढविण्यापर्यंतचीं अधम कृत्यें निंदकाच्या हातून होत असतात. अशा निंदकाचें जगांत कधींच कल्याण होत नाहीं किंवा त्याला मुक्ति मिळत नाहीं. मानवतेच्या मार्गांतील सर्प म्हणून मात्र याची संभावना होत असते.

" निंदा करणारास किंवा एकाद्याच्या पाठीमागें नालस्ती करणारास मोक्षाचें द्वार बंद असतें. निंदा करण्याचें प्रायश्चित्त एकच आणि तें म्हणजे ज्यांना दुखविलें असेल त्यांची माफी मागणें आणि ' परमेश्वरा ! माझ्या कृत्याबद्दल क्षमा कर ' असें म्हणून पुन्हां तसें कृत्य न करणें होय."

—हजरत महंमद पैगंबर.

---

## शिष्टाचार

शिष्टाचार हे सभ्यतेचे निदर्शक असतात. जितक्या योग्य रीतीनें आपण शिष्टाचार पाळूं, तितक्या योग्य रीतीनें आपण सभ्यतेचें पालन करूं शकूं. मनुष्याची सुसंस्कृतता शिष्टाचाराच्या योगें दिसून येते. ज्याला शिष्टाचार पाळतां येत नाहींत त्याला सुसंस्कृत मनुष्य असें कधींहि म्हणतां येणार नाहीं. शिष्टाचार म्हणजे थोरांमोठ्यांनीं पाळावयाचे रीतिरिवाज नसून प्रत्येक व्यक्तीनें ते आचरणांत आणावयाचे आवश्यक नियम आहेत. रोजच्या व्यवहारांत मनष्याची नम्रता दिसून यावी, त्याच्या अंतःकरणाचा विकास होत जावा आणि त्याला मानवतेची आठवण राहावी म्हणूनच इस्लाम-धर्मानें शिष्टाचाराच्या आज्ञा घालून दिल्या आहेत. आपल्याकडून दुसऱ्याचें अंतःकरण दुखविलें जाऊं नये, उलट आपल्या आचरणानें दुसऱ्याला आनंद व्हावा, हाच शिष्टाचाराचा प्रधान हेतु असतो.

संभाषण करावयाचे प्रसंग आपल्यावर दररोज अनेक वेळां येत असतात. संभाषण करतांना सौम्यपणें भाषण करण्याचा शिष्टाचार आपण पाळला पाहिजे. मनुष्याला बोलतांना सहसा भान राहत नाहीं. तो वाटेल तसें बेछूटपणें बोलूं लागतो. अशा तऱ्हेचा बेछूटपणा शिष्टाचाराला सोडून आहे; इतकेंच नव्हे, तर बोलतांना कर्कश आवाज काढून बोलणें हें देखील शिष्टसंमत नाहीं. आपलें संभाषण ऐकतांना

लोकांना आनंद वाटेल इतक्या सौम्यपणानें व सहानुभूतीनें आपण भाषण केलें पाहिजे.

**" तीन माणसें एकत्र असतां त्यांपैकीं दोघांनीं तिसऱ्याला ऐकूं न येईल अशा रीतीनें कुजबूज करूं नये; कारण त्यामुळें तिसऱ्याला दुखविल्यासारखें होईल. "**

—हजरत महंमद पैगंबर.

आपल्याभोंवतीं माणसें असतां सर्वांना ऐकूं येईल अशा रीतीनेंच आपण संभाषण करावें. बाकींच्याकडे दुर्लक्ष करून आपण एकाशींच बोलूं लागलों तर त्या माणसांची फार चमत्कारिक अवस्था होते. विशेषतः तीन माणसें असलीं म्हणजे तिसऱ्या मनुष्यास अशा प्रकारामुळें दुखविल्यासारखें होतें. तिसऱ्याला ऐकूं न येईल असें कुजबुजणें म्हणजे त्या तिसऱ्या गृहस्थाविषयीं गैरविश्वास प्रदर्शित करण्यासारखें आहे.

आपल्याकडे एखादा गृहस्थ आला तर प्रसन्न चित्तानें त्याला आपण उत्थापन दिलें पाहिजे व आपलेपणानें त्याला कुशलक्षेम विचारलें पाहिजे. त्या गृहस्थाच्या येण्यानें आपल्याला त्रास झाला तरी चेहऱ्यावर तो त्रास दाखवितां कामा नये. आपणांला तो मनुष्य आवडत नसला तरी आपण नाखुषी न दर्शवितां त्याची वास्तपूस केली पाहिजे.

**" लोकांना पाहून तिरस्कारानें तोंड फिरवूं नका. "**

—पवित्र कुराण, ३१:१८

तिरस्कारानें तोंड फिरवून एखाद्याविषयीं आपण तिटकारा प्रदर्शित केला, तर त्यामुळें त्या गृहस्थाचें मन खट्टू होतें, त्याला वाईट वाटतें; म्हणून अशा तऱ्हेनें त्याच्याविषयीं आपण तिरस्कारवृत्ति न दाखवितां त्याच्याशीं प्रेमळ वागणूक ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणें आपल्यासमोरून एखादा गृहस्थ येत असतां, त्याच्या लक्षांत येईल अशा तऱ्हेनें त्याला टाळून जाणें शिष्टाचाराला सोडून आहे. त्याच्याशीं फार तर बोलूं नका, पण नमस्कार करून त्याच्या बाजूनें निघून जाणें श्रेयस्कर आहे. ओळखीचा गृहस्थ समोरून येत असतां मुद्दाम बाजूला पाहत निघून जाणें बरें नव्हे. जातांजातां एक शब्द जरी आपण त्याच्याशीं बोललों किंवा नुसता नमस्कार केला तरी त्या गृहस्थास किती तरी बरें वाटतें.

प्रत्येक ओळखीच्या गृहस्थास अभिवादन केलेंच पाहिजे आणि त्यानेंहि पण उलट अभिवादन करून आपला चांगुलपणा दाखविला पाहिजे. अभिवादन करतांना पुढील शब्द उच्चारावे लागतात: "**अस्सलामु अलैकुम**" (तुम्हांवर सदोदित परमेश्वराची प्रीति व प्रेम असो). दुसऱ्या व्यक्तीनें तसेंच प्रत्युत्तर द्यावें लागतें. अभिवादन न करतां पुढें जाणारा गृहस्थ इस्लाम-धर्मांत अधर्मी समजला जातो. जेवतांनादेखील शिष्टाचार पाळला पाहिजे. चार मंडळींसह आपण जेवत बसलों असतां सर्वांआधीं जेवण आटपून ताटावरून उठणें गैरशिस्त समजलें जातें. सर्वांचें जेवण होईपर्यंत आपणांस त्यांच्यासमवेत बसावें लागतें.

> **"बाकीच्या मंडळीच्या अगोदर जेवण संपवून उठूं नये आणि जर कोणी उठलाच तर त्यानें मंडळीची क्षमा मागितली पाहिजे."**

—हजरत महंमद पैगंबर.

कित्येकांना सावकाश जेवावयाची संवय असते, त्यामुळें त्यांना जेवावयास बराच वेळ लागतो. बरोबरची मंडळी ताटावरून उठली म्हणजे अशा लोकांची अवस्था चमत्कारिक होते. लवकर उठावें तर अर्धपोटीं राहावें लागतें आणि उशीरां उठावें तर इतर मंडळी खादाड म्हणून म्हणावयाची भीति यामुळें त्यांची फार पंचाईत होते. याकरितां सर्वांचीं जेवणें संपेपर्यंत कुणींहि ताटावरून उठूं नये, असा निर्बंध घातला आहे.

दुसऱ्यांच्या घरीं आपण गेलों तर घरांत जाण्यापूर्वीं घरमालकाची परवानगी घेऊन नंतर आंत जावें लागतें. परवानगी विचारल्याखेरीज घरांत घुसणें पद्धतीस सोडून आहे. कदाचित् घरमालक घरीं नसतो. अशा परिस्थितींत एकदम दत्त म्हणून घरांत जाऊन उभें राहणें शिष्टाचाराला सोडून आहे.

**"परवानगी विचारल्याखेरीज कोणाच्याहि घरांत शिरूं नका आणि (परवानगी विचारून) आंत गेल्यावर कुटुंबांतील मंडळींना अभिवादन करा."**

—पवित्र कुराण, २४ : २७

परवानगीनंतर घरांत प्रवेश केल्याबरोबर घरांतील मंडळींना अभिवादन करावें लागतें. अभिवादन करावयाचा उद्देश घरांतील मंडळींचा प्रेमपूर्वक सन्मान व आदर करावयाचा असतो. घरांतील मंडळीकडूनहि सन्मानपूर्वक परत अभिवादन केलें जातें. आपल्यामध्यें व घरांतील मंडळीमध्यें प्रेम वृद्धिंगत करावयाच्या दृष्टीनें अशी पद्धत प्रशंसनीय ठरली आहे.

सर्वांत श्रेष्ठ शिष्टाचार म्हणजे अतिथिसत्कार होय. आपल्या घरीं आलेल्या पाहुण्यांचें अंतःकरणपूर्वक आदरातिथ्य करणें अत्यंत महत्त्वाची गोष्ट समजली जाते. आपल्या पाहुण्यांच्या सर्व सुखसोयींकडे जातीनें लक्ष दिलें पाहिजे. आपल्या घरीं पाहुण्याचा काल आनंदांत आणि सौख्यांत जाईल अशी व्यवस्था ठेविली पाहिजे. पाहुणा म्हणून कोणीहि आपल्या घरीं येवो त्याला सन्मानपूर्वक वागविणें हाच आपला धर्म समजला पाहिजे.

> **" परमेश्वरावर विश्वास ठेवणारानें आपल्या पाहुण्याचा सत्कार केला पाहिजे. "**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

मोठ्या दर्जाचा किंवा मानाचा मनुष्य आपल्याकडे पाहुणा म्हणून आला तर त्याचा सत्कार करावा आणि गरीब पाहुणा आला तर सत्कार करूं नये असा पक्षपात इस्लाम-धर्मांत नाहीं. मोठ्या दर्जाच्या पाहुण्यास ज्या इतमामानें वागविलें जातें त्याच इतमामानें गरीब पाहुण्यासहि वागविलें जातें. इस्लामी पाहुणचारांत गरीब आणि श्रीमंत असा भेदच नाहीं.

आपला पाहुणचार करणारा आपल्या घरीं आल्यास त्याचा पाहुणचार करावा, आणि आपला पाहुणचार न करणाऱ्याचा आपणहि पाहुणचार करूं नये अशी स्वार्थी वृत्ति इस्लाममध्यें नाहीं. आपण दुसऱ्याच्या घरीं पाहुणे म्हणून गेलों असतां दुसऱ्यानें आपला आदरसत्कार केला नाहीं तरी तो आपल्या घरीं आला असतां आपण अवश्य त्याचा सत्कार करून आपली दिलदार वृत्ति आणि खरें

आतिथ्य प्रदर्शित केलें पाहिजे. एका गृहस्थानें हजरत पैगंबरांना विचारलें, " जर एखाद्याच्या घरीं मी पाहुणा म्हणून गेलों असतां त्यानें माझी विचारपूस केली नाहीं आणि तोच गृहस्थ माझ्याकडे पाहुणा म्हणून आला तर मीं त्याचा आदरसत्कार करावा काय?" त्यावर हजरत पैगंबरांनीं " त्यानें तुमचा आदरसत्कार केला नाहीं तरी तुम्हीं त्याचा आदर सत्कार अवश्य केलाच पाहिजे " असें स्वच्छ उत्तर दिलें.

पाहुणा म्हणून येणाऱ्या गृहस्थानेंहि थोडें तारतम्य ठेवलें पाहिजे. आपल्या पाहुणचारामुळें घरांतील मंडळींची अत्यंत गैरसोय होत आहे असें दिसून आल्यास त्यानें तावडतोब काढता पाय घेतला पाहिजे. कुणाची गरीबी असते, कुणाच्या घरच्या मंडळींना जागाच अपुरी पडते, कुणाच्या घरीं माणसें आजारी असतात—अशा गैरसोयींचा पाहुण्यानें अवश्य विचार केला पाहिजे. थोरपणामुळें यजमान जावयास सांगत नाहीं, म्हणून पाहुण्यानें त्या ठिकाणीं राहणें म्हणजे यजमानाच्या चांगुलपणाचा अंत पाहण्यासारखें आहे.

> **" यजमानाची गैरसोय होईल इतक्या लांब मुदतीचा मुक्काम करणें पाहुण्यास शोभत नाहीं."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

पाहुण्यांच्या राहण्यानें यजमानास आनंद वाटेल आणि यजमानाच्या वागण्यानें पाहुण्यास समाधान वाटेल अशी परिस्थिति असेपर्यंतच पाहुण्यानें पाहुणचार घेत राहणें शहाणपणाचें ठरणार आहे.

## कर्मयोग

**“ जो समर्थ आणि लायक असून आपल्याकरितां किंवा दुसऱ्याकरितां काम करीत नाहीं, त्याच्यावर परमेश्वराची केव्हांहि कृपादृष्टि होणार नाहीं. ”**

—हजरत महंमद पैगंबर.

प्रत्येक व्यक्तीनें कर्म करीत राहणें हा त्या व्यक्तीचा महान् धर्म आहे. काम न करितां आळशीपणानें बसून राहणें इस्लाम-धर्माच्या दृष्टीनें अत्यंत गर्ह्य समजलें जातें. आळशी माणसाला इस्लाम-धर्मांत काडीचीहि किंमत नसते. परमेश्वरानें आपणांस जन्म दिला तो ऐदीपणानें बसून खाण्याकरितां नसून काम व श्रम करण्याकरितां दिला आहे. मनुष्याच्या अंगांत ऐदीपणा असणें हें त्याच्या दुर्दैवाचें लक्षण आहे.

**“परमेश्वरा, असामर्थ्य आणि आळस यांपासून वांचव.”**

—हजरत महंमद पैगंबर.

‘ काम करावयाचें सामर्थ्य आपल्या अंगीं नाहीं ’ असे रडवे उद्गार न काढतां ‘ परमेश्वरा, काम करावयास मला सामर्थ्य दे, ’ असे स्फूर्ति-दायक उद्गार काढावयास शिकलें पाहिजे. त्याचप्रमाणें आळसापासून अलिप्त राहावयाचा प्रत्येकानें निश्चयपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. मनुष्य सर्व कांहीं करूं शकतो, पण त्याला निश्चयाचें बळ पाहिजे. माझ्या हातून ही गोष्ट झालीच पाहिजे, अशा निश्चयानें आपण कामास सुरुवात करूं तर आपणांस त्या कार्यांत यश मिळावयास थोडा देखील अवधि लागणार नाहीं.

अशा तऱ्हेनें श्रम करून आपला चरितार्थ किंवा गुजारा चालविणें सन्मानाचें समजलें जातें. आज आपण श्रम करून आपल्याकरितां व आपल्या कुटुंबियांकरितां रोटी मिळविली आणि त्याकरितां दुसऱ्याकडे तोंड वेंगाडावें लागलें नाहीं यांतच एक प्रकारचा आनंद व अभिमान समावलेला असतो. अशा तऱ्हेचा आनंद दुसऱ्याकडून पैसे मागून आणण्यांत किंवा अप्रामाणिकपणें पैसे मिळविण्यांत नाहीं.

> **" श्रम करून प्रामाणिकपणानें जीवित कंठणारे लोक परमेश्वरास फार आवडतात."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

श्रम न करितां फसवाफसवी करून, खोटें बोलून किंवा अयोग्य मार्गानें पैसे मिळविणारे लोक परमेश्वरास कधींच आवडत नाहींत आणि अशा लोकांना जगांत मानहि पण मिळत नाहीं. लोकांना फसवून पैसे मिळविणें आणि त्या पैशाच्या जोरावर दिमाखानें वावरणें याच्यासारखी निंद्य गोष्ट जगांत दुसरी कोणतीहि नसेल. अशा गृहस्थानें परमेश्वराची वाटेल तितकी प्रार्थना केली तरी परमेश्वर अशा गृहस्थावर कधींच प्रसन्न होत नाहीं.

> **" जो मनुष्य आपल्या गरजा व चरितार्थ योग्य रीतीनें (श्रम करून) चालवितो त्याची प्रार्थना परमेश्वरचरणीं रुजू होते आणि जो मनुष्य अन्याय्य आणि नापसंत मार्गांनीं गरजा भागवितो त्याची प्रार्थना परमेश्वराच्या दरबारांत कधींच मंजूर होत नाहीं."**
>
> ——हजरत महंमद पैगंबर.

परमेश्वर सर्वव्यापी व सर्वज्ञ आहे. आपण निर्माण केलेल्या प्राणिमात्रांना फसवून आणि त्यांना दुःख देऊन आपली तुंबडी भरणाऱ्या बदमाष व स्वार्थी माणसांनीं केलेल्या प्रार्थनेकडे दुर्लक्ष करणें हेंच यथायोग्य व न्याय्य आहे असें परमेश्वराला वाटणें साहजिक आहे. त्याचप्रमाणें नापसंत मार्गांनीं गरजा भागविणाऱ्यांची तशीच संभावना परमेश्वर करतो. नापसंत मार्ग याचा अर्थ सदभिरुचीला सोडून असणारे मार्ग होत.

'**भिक्षां देहि**' हा असाच नापसंत मार्ग आहे. मनुष्य धडधाकट असतां त्यानें भिक्षा मागून पैसे मिळविणें कोणीहि पसंत करणार नाहीं. प्रत्येक धट्टयाकट्टया माणसानें कष्ट करूनच चरितार्थ चालविला पाहिजे. विशेषतः परमेश्वराच्या नांवावर असा मनुष्य पैसे मिळवूं लागला म्हणजे त्याबद्दल कोणालाहि चीड आल्याखेरीज राहणार नाहीं.

> **"परमेश्वराच्या नांवावर भिक्षा मागत फिरणारा अत्यंत धिःकारयुक्त समजला जातो."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

श्रम करण्याचें अंगीं सामर्थ्य असतां परमेश्वराच्या नांवावर भिक्षा मागणें म्हणजे परमेश्वराचा अपमान करण्यासारखें आहे. जे अनाथ, लुळे, पांगळे किंवा असमर्थ आहेत त्यांनीं भिक्षा मागितली तर योग्य होईल; पण समर्थ आणि दणकट माणसानें भिक्षा मागून इतर असमर्थ भिक्षेकऱ्यांची गैरसोय करावी हें कोणालाहि युक्त वाटणार नाहीं. भिक्षा मागणें अत्यंत लाजिरवाणी गोष्ट समजून भिक्षेकऱ्यानें श्रम करून पैसे मिळवावयास शिकलें पाहिजे. श्रमानें मिळविलेलें अन्न हें भिक्षा

मागून आणलेल्या अन्नापेक्षां सहस्रपटीनें श्रेष्ठ आहे असें समजून त्या दिशेनें प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे.

**" लोकांजवळ भिक्षा मागण्यापेक्षां जंगलांत जाऊन लांकडांचा बोजा दोरीनें बांधून आपल्या पाठी-वर वाहून आणणें आणि तो विकून पैसे मिळविणें सर्वांत चांगलें होय. असे पैसे मिळ-विणाऱ्याचा मान परमेश्वर राखतो. त्यानें लोकां-जवळ भीक मागितली आणि त्यांनीं ती दिली नाहीं तर त्याच्या कीर्तीस धक्का बसतो आणि निराशा होते; पण यापेक्षां भीक मिळणें वाईट होय, कारण त्यामुळें उपकाराचा निष्कारण बोजा होतो. "**

—हजरत महंमद पैगंबर.

भिक्षा न मिळाली काय आणि मिळाली काय दोहोंपासून मनुष्याचें नुकसान आहे. भिक्षा मिळाली नाहीं तर मनुष्याला भयंकर निराशा वाटते आणि दिवसेंदिवस तो मनानें दुर्बल होत जातो. पुढें पुढें वाटेल त्या अनन्वित प्रकारानें तो भिक्षा मिळविण्याचा प्रयत्न करूं लागतो. त्यामुळें त्याच्या अंतःकरणाच्या सद्भावनांचा लोप होत जाऊन तो पशू बनत जातो आणि मनुष्यत्वास निष्कारण मुकतो. भिक्षा मिळणें तर त्याहून वाईट. त्यामुळें तो मनुष्य ' भिक्षां देहि ' पासून परावृत्त होण्या-ऐवजीं ' भिक्षां देहि ' हाच आपला धर्म समजूं लागतो. शिवाय लोकांच्या उपकाराचा बोजा त्याच्या शिरावर बसत जातो तो वेगळाच. मनुष्यानें

निष्कारण आपल्यावर कोणाचे उपकार करून घेऊं नयेत. उपकार करून घेणारा गृहस्थ स्वाभिमानापासून परावृत्त होऊं लागतो आणि पुढें पुढें तर त्याला स्वाभिमान शिल्लक राहातच नाहीं. अशा तऱ्हेचे निर्बल आणि ज्यांना स्वाभिमान नाहीं असे असंख्य भिक्षेकरी राष्ट्रामध्यें असणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यंत घातुक आहे.

**" राष्ट्रामध्यें बहुसंख्याक लोक 'भिक्षां देहि' करूं लागले म्हणजे राष्ट्राचा अधःपात होतो."**

—हजरत महंमद पैगंबर.

भिक्षावृत्तीमुळें लोक आळशी, ऐदी, निर्बल आणि परावलंबी बनल्यावर राष्ट्राचा उद्धार व्हावयाची भाषाच बोलावयास नको. राष्ट्राबरोबरच मानवतेचेंहि भयंकर नुकसान होतें. भिक्षा मिळविण्याकरितां फसवाफसवी, लबाडी, लुच्चेगिरी यांना ऊत येतो आणि त्यामुळें भीक मागणारांच्या सद्भावना करपल्या जातात, त्यांच्या कर्तबगारीस ग्रहण लागतें. आपल्या शक्तीचा उपयोग मानवांच्या कल्याणासाठीं न करतां ते आत्मवंचनेकडे करूं लागतात.

अशा प्रकारची हृदयविदारक आणि भीषण परिस्थिति नष्ट करावयाची असेल व आपल्यामध्यें सौख्य व उत्कर्षाची उत्कट भावना निर्माण करावयाची असेल तर प्रत्येकानें कार्यरत होण्याचा निश्चय केला पाहिजे; कष्ट आणि शारीरिक श्रम करण्याचा चंग बांधला पाहिजे.

**" आपल्या कामांत कळकळ आणि आवड उत्पन्न करा."**

—हजरत महंमद पैगंबर.

आपल्या शिरावर अत्यंत त्रासदायक कार्य पडलें तर त्यामुळें कंटाळून न जातां त्या कामांत कळकळ आणि आवड उत्पन्न केली पाहिजे. कुठलेंहि आणि कसलेंहि कार्य कळकळीनें केलें कीं त्यांत आवड उत्पन्न होतेच आणि ही आवड उत्पन्न झाल्यावर त्या कामाचा आपणांस काडीमात्र त्रास वाटणार नाहीं. जसे आपण आपल्या आवडीच्या खेळांत किंवा करमणुकींत रत होतों, त्याप्रमाणें त्या कार्यांत आपण रत होऊं लागतो, आणि दुसरें, तें कार्य आवडीनें केल्यानें त्या कार्याची फलश्रुति अपक्षेबाहेर यशस्वी व आनंद-दायक होते.

**“कार्य तुम्हांस नेहमीं आनंदी ठेवील. कार्य करतांना तुमच्या अंतःकरणांत महत्त्वाकांक्षा निर्माण होईल आणि त्यामुळें तुमची बुद्धिमत्ता आणि ज्ञान वाढेल.”**

—हजरत महंमद पैगंबर.

सतत कार्य करण्यानें मनुष्याचें मन नेहमीं आनंदी व प्रसन्न राहतें. आळसामुळें सुचणारे ऐदीपणाचे विचार व सुस्तपणा चटकन् नाहींसा होतो. मनुष्याचें मन आनंदी व उल्हसित झाल्यामुळें तें कार्य चांगल्या तऱ्हेनें होऊं लागतें आणि कार्य करितांना मनुष्याचे मनांत एक प्रकारची उत्कर्षाची महत्त्वाकांक्षा निर्माण होते. महत्त्वाकांक्षा निर्माण झाली कीं, त्या कार्यांत अधिक सुंदरपणा आणण्याकरितां मनुष्याची बुद्धि आणि ज्ञान प्रगल्भ होऊं लागतें.

**“धंदा आणि कार्य यांमधील व्यग्रता तुमची सांपत्तिक आणि नैतिक परिस्थिति सुधारील आणि**

त्यामुळें एक दिवस तुम्ही खात्रीनें मोठे पुरुष व्हाल. ”

—हजरत महंमद पैगंबर.

आळसामुळें खालावलेली सांपत्तिक परिस्थिति सतत कार्य करण्यानें सुधारून आपणांस सुखाचे दिवस येतील. सांपत्तिक परिस्थितीबरोबर आपली नैतिक परिस्थिति देखील सुधारते. आपल्या अंतःकरणांत दडलेले दुष्ट विचार आणि कल्पना निघून जातात आणि त्या ठिकाणीं चांगले विचार आणि उत्कर्षाच्या कल्पना स्थित होतात. ‘ कार्याच्या जोरावर पैसा मिळवून तो मानवजातीच्या कल्याणाकरितां खर्च करूं ’ अशी हिम्मत निर्माण होते. आपल्याबरोबर आपल्या समाजाचा, देशाचा आणि राष्ट्राचा उत्कर्ष करण्याचा उत्साह नसानसांत संचरूं लागतो. ही हिम्मत आणि उत्साह यांचें संमीलन झालें कीं एक दिवस थोर पुरुष म्हणून कीर्ति मिळवावयाचें भाग्य तुमच्या नशीबीं खात्रीनें ठेविलेलें आहे. जगामध्यें मोठेपणा फुकट मिळत नसतो. नुसत्या श्रीमंतीवर मोठेपणा मिळवितां आला असता तर प्रत्येक शहरांत शेंकड्यांनीं मोजण्याइतके मोठे पुरुष आपणांस दिसून आले असते. नुसत्या घरंदाजपणावर मोठेपणा मिळाला असतां तर प्रत्येक खेड्यांत एकएक महापुरुष दिसून आला असता. मोठेपणा हा सुखासुखीं कधींच मिळत नसतो. मोठेपणा मिळविण्याकरितां हाडाचीं काडें करावीं लागतात, देह झिजवावा लागतो आणि निथळणारा घाम पडावा लागतो. मोठेपणा प्राप्त करून घेण्याचा एकच मार्ग तो म्हणजे कर्मयोग.

## धैर्य

"संकटें कोसळलीं असतां आणि हाल होत असतां, जे लोक निश्चयापासून ढळत नाहींत व सहनशीलतेनें वागतात तेच खरे धैर्यवान् लोक होत."

—पवित्र कुराण, २:१७२

धैर्य ही कर्तबगार आणि निश्चयी मनुष्याची जीवन-ज्योत आहे. मनुष्य ध्येयाकडे जात असतां त्याच्यावर हजारों संकटें कोसळतात, अनेक अडचणी उपस्थित होतात, पण अशा संकटांना किंवा अडचणींना न जुमानतां आपला रस्ता काढणें हाच खऱ्या धैर्यवान् गृहस्थाचा बाणा असतो. आपल्यापुढें येणाऱ्या प्रत्येक अडचणीसमोर आपण हात जोडून बसलों तर आपला कार्यक्रम कधींच होणार नाहीं. येईल त्या अडचणींना व संकटांना धैर्यानें तोंड देणें हेंच आपलें कर्तव्यकर्म समजलें पाहिजे. संकटें न येतां किंवा कसलाहि त्रास न होतां एखादें कार्य आपण पार पाडलें म्हणजे त्या कार्यसिद्धीकरितां आपण धैर्य दाखविलें असें मात्र कधींच म्हणतां येणार नाहीं. संकट हा धैर्याचा निकष समजला जातो. संकटाखेरीज धैर्य कसोटीसच उतरत नाहीं.

विचार न करतां केलेल्या धाडसास आपण केव्हांहि धैर्य म्हणूं शकत नाहीं. सिंहाच्या पिंजऱ्यांत उडी मारणारा इसम किंवा विस्तवाचा निखारा हातांत धरणारा बालक यांचें कृत्य धैर्याचें आहे असें

कोणालाच म्हणतां येणार नाहीं. जें धाडस करावयाचें, त्याचे परिणाम लक्षांत आणून वागणारा मनुष्य धैर्यवान् ठरूं शकेल. आपण जुलमी सत्तेचा प्रतिकार करण्याचें धाडस करीत आहोंत पण त्यामुळें आपणांस अत्यंत कष्ट सोसावे लागतील, उपाशींतापाशीं राहावें लागेल, अनन्वित हाल भोगावे लागतील, इतकेंच नव्हे, तर प्रसंगीं प्राणासहि मुकावें लागेल या सर्व गोष्टींचा विचार करून जुलमी सत्तेचा प्रतिकार करण्याचें धाडस करणारा गृहस्थ धैर्यवान् या संज्ञेस प्राप्त होईल. परिणामाची जाणीव असल्याखेरीज, त्या धाडसास धैर्याचा टिळा लागूं शकत नाहीं. परिणाम लक्षांत न घेतां केलेलें धाडस म्हणजे भावनेच्या भरांत मारलेली मुसांडी होय.

त्याचप्रमाणें धैर्यास योग्य कारण लागतें. योग्य कारण नसतांना केलेलें कृत्य मूर्खपणाच्या किंवा अविचाराच्या सदरांत पडतें. होळी पेटत असतां त्यांत उडी मारणाऱ्या गृहस्थास आपण अविचारी म्हणूं, पण घराला आग लागली असतां आंत निजलेलें मूल वांचविण्याकरितां आगीमध्यें उडी घेणाऱ्या गृहस्थाचा 'धैर्यवान्' म्हणून गौरवच केला पाहिजे. धैर्य म्हणजे मूर्ख माणसाची उसळी नसून विचारी माणसाचा अभंग निश्चय होय, अशीच आपणांस धैर्याची समर्पक व्याख्या करावी लागेल.

धैर्यवान् माणसास मरणाची क्षिती कधींच वाटत नाहीं. मृत्यूला आनंदानें कवटाळण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं आलेलें असतें. डरपोक माणसाप्रमाणें मृत्यु म्हटला कीं एकदम हाय खाण्याचा कमकुवतपणा तो कधींहि दाखवीत नाहीं. सदाचारामुळें त्याच्या अंगांत हिम्मत

आलेली असते, न्यायी वर्तनामुळें त्याच्या अंतःकरणास कणखरपणा आलेला असतो, सच्छील वृत्तीमुळें त्यांच्यामध्यें आत्मिक सामर्थ्य निर्माण झालेलें असतें. अशा धैर्यशाली माणसास मरणाची भीति वाटणें कधीं शक्य नसतें.

**" मुसलमान मरणास कृपा समजतो. "**

—हजरत महंमद पैगंबर.

धैर्यवान् मुसलमान मनुष्य मरणास आपत्ति न समजतां कृपा समजतो. अन्यायाचें परिमार्जन करीत असता किंवा मानवतेचा मार्ग निष्कंटक करीत असतां त्याला मरण प्राप्त झालें तर ती एक पुण्याई आहे असें तो मानतो. अशा निधड्या छातीचीं धैर्यवान् माणसें निर्माण करण्यांत इस्लाम-धर्मास धन्यता वाटते.

**" त्यांच्या शत्रूंना जीविताविषयीं प्रेम वाटत नसेल इतकें प्रेम त्यांना मृत्यूविषयीं वाटतें. "**

—हजरत महंमद पैगंबर.

वरील स्फूर्तिदायक वाक्य अन्यायाचें पारिपत्य करावयास निघालेल्या आपल्या अनुयायांविषयीं हजरत पैगंबरांनीं काढलें आहे. अन्यायी, अनाचारी आणि बदफैली माणसें आपल्या जीवाला काडीमात्र धक्का लागूं नये म्हणून अत्यंत खबरदारी घेत असतात. ते आपल्या जीवितावर प्रेम करीत नसतील इतकें प्रेम धैर्यवान् मनुष्य मृत्यूवर करतो.

---

## ज्ञान-प्राप्ति

**" परमेश्वरा, माझ्यामध्यें ज्ञानाची वृद्धि कर. "**

—पवित्र कुराण, २०:११३

ज्ञानाची प्राप्ति करून घेणें हें एक मनुष्याचें अत्यंत आवश्यक व निकडीचें कर्तव्य आहे. मनुष्याचा जीवनक्रम सौष्ठवपूर्ण व यशस्वी होण्यास ज्ञानाची अत्यंत आवश्यकता भासते. ज्ञानार्जन न करतां मनुष्यानें उत्कर्षाकरितां व सौख्याकरितां केलेली धडपड अल्पायुषी व निष्फळ ठरते. डोळे बांधून मार्ग आक्रमण करण्याची हिम्मत आणि ज्ञानप्राप्तीखेरीज यशस्वी होण्याची महत्त्वाकांक्षा यांत तत्त्वतः कांहींच फरक नाहीं. अशा तऱ्हेची हिम्मत किंवा महत्त्वाकांक्षा यांना इस्लाम-धर्मांत स्थान नाहीं. ज्ञानाच्या अधिष्ठानाखेरीज कुठलीहि गोष्ट फलद्रूप होत नाहीं, असा इस्लाम-धर्मास विश्वास वाटतो आणि म्हणूनच ज्ञानप्राप्ति हें इस्लाम-धर्माचें अवश्यमेव अंग बनून राहिलें आहे.

**" ज्ञानप्राप्ति करून घेणें हें प्रत्येक मुसलमान स्त्रीपुरुषाचें कर्तव्य आहे. "**

—हजरत महंमद पैगंबर.

पुरुषांप्रमाणें स्त्रियांनींहि अवश्य ज्ञानप्राप्ति करून घेतली पाहिजे. ज्ञान ही फक्त पुरुषांची मालमत्ता नसून स्त्रियांचाहि ज्ञानावर हक्क आहे. केवळ पुरुषांनाच ज्ञानप्राप्ति करण्याचा अधिकार देऊन स्त्रियांना अज्ञानांत ठेवण्याचा इस्लामचा केव्हांहि हेतु नाहीं. स्त्रियांना शिक्षण दिलें कीं त्या पुरुषांच्या डोकीवर बसतील, उद्दाम बनतील

अशी निराधार भीति इस्लाम-धर्म आपल्या उराशीं बाळगीत नाहीं. स्त्रियांना अज्ञानांत ठेवण्याचा पुरुषांचा स्वार्थी डाव उधळून लावण्याचा निर्धार इस्लाम-धर्मानें केला आहे. समाजाची उन्नति स्त्री आणि पुरुष या दोघांकडून होत असते. केवळ पुरुषांनाच शिक्षण घेण्याची मुभा देऊन इस्लाम-धर्म समाजास विकलांग करूं इच्छित नाहीं. समाजाची प्रगति आणि विकास हें इस्लामचें अंगभूत कार्य असल्यामुळें, हें कार्य साध्य करण्याकरितां पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाहि ज्ञानवंत होण्याची इस्लाम-धर्म आज्ञा करीत आहे. ज्ञानप्राप्ति करून घेण्याकरितां पुरुषां-प्रमाणें स्त्रियांनींहि वाटेल तो त्रास सहन करण्याची तयारी दर्शविली पाहिजे.

> **"जो ज्ञान मिळविण्याकरितां घरदार सोडतो तो परमेश्वराचा मार्ग आक्रमण करूं लागतो."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

आम्हीं राहतों त्या ठिकाणीं ज्ञानार्जनाची सोय नाहीं असें रडगाणें न गातां, ज्ञानाची प्राप्ति करून घेण्याकरितां आपलें घरदार, आईबाप आप्तेष्ट यांना सोडून वाटेल तेथें जाण्याची आपली तयारी पाहिजे, वाटेल ती हालअपेष्टा भोगण्याची उत्सुकता पाहिजे. अशा तऱ्हेची तयारी जो दाखवील तो अत्यंत पुण्यवान् समजला पाहिजे.

> **"प्रत्येक व्यक्तीनें जन्मल्यापासून मरेपर्यंत ज्ञानार्जन केलें पाहिजे."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

एकदां ज्ञानाची प्राप्ति झाली कीं आपलें कर्तव्य संपलें असें कोणीं

समजूं नये. त्या ज्ञानामध्यें भर घालण्याकरितां आपला सतत प्रयत्न चालूं पाहिजे. ज्ञानाला ठराविक मर्यादा नाहीं. आपण ज्ञानांत जितकी भर घालूं तितकी ती हवीच असते. या दृष्टीनें मनुष्यानें आपल्या आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत ज्ञानाची लालसा सोडतां कामा नये.

आपण जें ज्ञान संपादन केलें आहे त्याचा उपयोग दुसऱ्यास करून दिला पाहिजे. आपण एकटेच ज्ञानी होऊन बसलों तर आपल्या ठिकाणीं असलेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग झाला असें आपणांस कधींच म्हणतां यावयाचें नाहीं. ज्ञान संपादन करून त्याचा प्रसार करणें हें ज्ञानप्राप्तीचें ध्येय पाहिजे.

> **"ज्या ज्ञानापासून दुसऱ्यास फायदा होत नाहीं तें ज्ञान, दानधर्माकरितां एक पैसाहि खर्च होत नाहीं अशा खजिन्यासारखें आहे."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

एखाद्या कद्रू माणसाजवळ पैशानें तुडुंब भरलेला खजिना असतो, पण त्या खजिन्यामधील एक कपर्दिकहि गोरगरीबांच्या कल्याणाकरितां खर्च करण्याची सद्बुद्धि होत नाहीं. अशा गृहस्थानें आपल्या पैशाचा किंवा खजिन्याचा कितीहि गर्व वाहिला तरी जगाच्या दृष्टीनें त्याची किंमत कवडीइतकीच. त्याचप्रमाणें ज्या विद्वानाजवळ ज्ञानभांडार भरपूर असतें त्याच्याकडून दुसऱ्यास ज्ञानदान झालें नाहीं तर त्याचें ज्ञान-भांडार असून नसून सारखेंच. फार तर त्या ज्ञानभांडाराच्या जोरावर स्वत: फायदा करून घेऊं शकेल, पण त्यानें आपल्या ज्ञानाचा यथा-योग्य उपयोग केला असें कोणीहि समंजस मनुष्य म्हणणार नाहीं.

**“ ज्ञानी कोण ? जे आपलें ज्ञान उपयोगांत आणतात ते. ”**

—हजरत महंमद पैगंबर.

आपल्यास जें ज्ञान आहे त्याचा प्रसार जनतेंत करणें म्हणजेच त्या ज्ञानाचा खरा उपयोग करणें होय. आपल्या ज्ञानाचा असा योग्य उपयोग करणारासच ज्ञानी हें नांव शोभून दिसेल. आपल्याप्रमाणेंच प्रत्येक व्यक्ति ज्ञानवंत व्हावी अशी सदिच्छा प्रत्येक विद्वान् गृहस्थानें बाळगली पाहिजे.

ज्ञानदान हेंच ज्ञानप्राप्तीचें ध्येय असें समजणारा गृहस्थ खरा विद्वान् या संज्ञेस प्राप्त होतो. अशा विद्वानांस इस्लाम–धर्मांत फार उच्च स्थान आहे. जगामध्यें हुतात्म्याचा दर्जा अत्यंत श्रेष्ठ मानला जातो, पण इस्लाम–धर्मानें विद्वान् माणसांना हुतात्म्यापेक्षांहि श्रेष्ठ कोटीला नेऊन बसविलें आहे.

**“ हुतात्म्याच्या रक्तापेक्षां विद्वान् माणसाच्या लेखणींतला एक थेंब अधिक पवित्र आहे. ”**

—हजरत महंमद पैगंबर.

विद्वान् मनुष्य आपल्या लेखणींतल्या प्रत्येक थेंबागणीक एक एक हुतात्मा निर्माण करूं शकतो, हेंच वरील वाक्यावरून स्पष्टपणें ध्वनित होतें. आणि म्हणूनच इस्लाम-धर्मानें विद्वान् माणसाला श्रेष्ठ स्थानावर नेऊन बसविलें आहे.

**“ विद्वानांचा सन्मान हा माझा सन्मान आहे. ”**

—हजरत महंमद पैगंबर.

जगाच्या इतिहासांत सन्मानाचें अत्युच्च स्थान मिळविणारे हजरत महंमद पैगंबर आग्रहानें सांगत आहेत कीं माझा सन्मान करावयाचा असेल तर विद्वान् माणसांचा प्रथम सत्कार करा; त्यांचा सत्कार हा माझा सत्कार समजतों. इस्लाम-धर्मानें विद्वान् माणसाला जगामध्यें अत्यंत वंद्य व पूज्य मानलेल्या महाभागांच्या पंक्तींत श्रेष्ठ दर्जाचें स्थान प्राप्त करून दिलें आहे.

## शेजारधर्म

**" जो आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस शिव्याशाप व त्रास देतो, त्यानें परमेश्वराची कितीहि प्रार्थना केली तरी परमेश्वर त्याच्या प्रार्थनेची पर्वा करीत नाहीं."**

—हजरत महंमद पैगंबर.

आपल्या शेजाऱ्यांवर प्रेम करणें हा एक श्रेष्ठ धर्म आहे. आपले शेजारी हे परके नसून आपल्या कुटुंबियांपैकींच आहेत, या भावनेनें आपण शेजाऱ्यांशीं प्रेमळपणानें वागलें पाहिजे. शेजाऱ्यांस शिव्याशाप देणें, त्यांच्याशीं वैर धरणें किंवा त्यांना त्रास देणें, हें शेजारधर्मास अनुसरून नाहीं. अशा तऱ्हेचें तुसडें आचरण ठेवणारा मनुष्य, मानवप्रेमाविषयीं उदासीन असणें साहजिक आहे. ज्याला आपल्या शेजाऱ्यांवर प्रेम करतां येत नाहीं त्याला देशबांधवांवर कधींच प्रेम करतां येणार नाहीं. शेजाऱ्यांवर प्रेम करणें म्हणजे आपल्या राष्ट्रबांधवांवर प्रेम करण्यास शिकणें होय. शेजारधर्मांतूनच राष्ट्रधर्माची निष्पत्ति होत असते म्हणून शेजारधर्म हा श्रेष्ठ धर्म मानला गेला आहे.

**"परमेश्वरावर विश्वास ठेवूं इच्छिणाऱ्या व्यक्तीनें शेजाऱ्यांना दुखवूं नये."**

—हजरत महंमद पैगंबर.

आपल्या शेजाऱ्यांच्या मनोभावना दुखावल्या जातील अशा प्रकारचें कोणतेंहि कृत्य न करण्याबद्दल हजरत पैगंबर आज्ञा करीत

आहेत. आपले शेजारी हे आपल्याच धर्माचे असूं शकतील असें नाहीं. ते निरनिराळ्या धर्मांचे, पंथाचे असण्याचा संभव आहे. एखादें कृत्य आपणांस योग्य वाटतें पण त्यामुळें आपल्या शेजाऱ्यांना दुःख होत असेल तर तें कृत्य आपण कधींहि करूं नये. त्याचप्रमाणें शेजाऱ्यांचें अंतःकरण दुखावलें जाईल अशा प्रकारची अभद्र भाषा किंवा ओंगळ प्रकार न करण्याची आपण खबरदारी घेतली पाहिजे. इतकेंच नव्हे, तर त्यांची कुठल्याहि तऱ्हेनें गैरसोय होईल असें आचरण करूं नये.

> **" परमेश्वरावर विश्वास ठेवणाऱ्यानें शेजाऱ्यांची गैरसोय होईल असें वर्तन करूं नये. "**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

शेजाऱ्यांची गैरसोय करणें म्हणजे त्यांना एक प्रकारचा त्रास देणें होय. आपल्या सोईकरितां दुसऱ्यांची गैरसोय करणें केव्हांहि उचित नाहीं. आपल्याप्रमाणेंच आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या सोयी-गैरसोयी आहेत, याचा आपण प्रथम विचार केला पाहिजे. 'मनःपूतं समाचरेत्' या न्यायानें आपण शेजाऱ्यांशीं वागूं लागलों तर अशा तऱ्हेची वागणूक त्याज्य ठरल्याखेरीज राहणार नाहीं.

शेजाऱ्यांची सहानुभूति संपादन करणें आपलें कर्तव्यकर्म आहे असें समजून आपण तशी वागणूक ठेविली तर शेजाऱ्यांच्या मनांत आपल्याविषयीं प्रेम निर्माण झाल्याखेरीज राहणार नाहीं. पण ही सहानुभूति शाब्दिक किंवा कोरडी असूं नये. शेजाऱ्यांबद्दल सहानुभूति पाहिजे, पण ती ओंठांतून निघालेली नको तर अंतःकरणांतून निघा-

लेली पाहिजे. ज्या सहानुभूतीचा जन्म अंत:करणांत होतो तीच सहानुभूति मानवतेची सेवा करूं शकते.

**“ जो स्वतः पोटभर जेवतो व शेजाऱ्यांना उपाशीं ठेवतो, तो पक्का मुसलमान नव्हे. ”**

—हजरत महंमद पैगंबर.

आपला शेजारी उपाशीं राहिला तर ‘ आपण उपाशीं आहोंत; फार वाईट वाटतें ’, अशी शाब्दिक सहानुभूति व्यक्त करून बाजूला तोंड न फिरवितां, आपण अर्धपोटीं राहून आपली अर्धी भाकरी त्याला देण्यांतच खरी सहानुभूति व्यक्त होते. आपल्या घरीं पक्वान्नांचा वास दरवळावा आणि शेजाऱ्यांच्या घरीं उपासमार व्हावी अशी परिस्थिति आपणांस असह्य वाटली पाहिजे. आपल्या घरीं केलेल्या पक्वान्नांचा, गरीब आणि उपाशीतापाशी शेजाऱ्यांना व त्यांच्या कच्चाबच्चांना थोडासा कां होईना आस्वाद घेऊं देणें हाच खरा शेजारधर्म समजला पाहिजे. शेजाऱ्यांची उपासमार होत आहे हें धडधडीत दिसत असूनसुद्धां, आकंठ जेवणारा गृहस्थ सच्चा मुसलमान होऊं शकत नाहीं.

**“ जो गृहस्थ थोडा वेळ प्रार्थना करतो आणि थोडा दानधर्म करतो पण शेजाऱ्यांच्या कल्याणाकरितां अहर्निश झटतो तो श्रेष्ठ मानवांपैकीं एक होय. ”**

—हजरत महंमद पैगंबर.

आपल्या शेजाऱ्यांच्या स्वास्थ्याकरितां जो रात्रंदिवस धडपडतो, त्याच्या कल्याणाकरितां जो आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करतो

त्याच्या हातून कमी दानधर्म झाला तरी त्याची क्षिती बाळगण्याचें त्यास कारण नाहीं. शेजाऱ्यांच्या उपयोगी पडणें हा एक प्रकारचा दानधर्म आहे; ही एक प्रकारची प्रार्थना आहे. शेजारधर्माविषयीं सतत जागरूक राहणारा गृहस्थ इस्लाम-धर्माच्या दृष्टीनें सन्मान्य समजला जातो.

## आईबापांवर प्रेम

**“ आईबापांशीं दयाळूपणानें वागा, अशी परमेश्वराची तुम्हांला आज्ञा आहे. ”**

—पवित्र कुराण, १७:२३

आपल्या आईबापांशीं अत्यंत प्रेमानें आणि दयाळूपणानें वागण्याचा दंडक इस्लाम-धर्मानें घालून दिला आहे. आईबापांशीं प्रेमळपणानें वागणें, त्यांना संतोषविणें, त्यांची सेवा करणें या गोष्टी परमेश्वराच्या आज्ञा समजून त्या प्रत्येकानें अमलांत आणल्या पाहिजेत. आपल्या आईबापांना नेहमीं त्रास देणाऱ्या, त्यांचा छळ करणाऱ्या पाषाणहृदयी गृहस्थावर परमेश्वर कधींच प्रेम करीत नाहीं. आईबापांना दुखविणें म्हणजे परमेश्वराची आज्ञा पायदळीं तुडविणें होय.

आईबापांच्या वृद्धापकाळीं तर चुकूनसुद्धां गैरवाजवी शब्द त्यांना बोलतां कामा नये. उतारवयांतील त्यांचा प्रत्येक क्षण आनंदांत जाईल अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे.

**“ आईबापांच्या वृद्धापकाळीं त्यांना लागेल असा एकहि धिःकारयुक्त शब्द वापरूं नका किंवा धमकीवजा बोलूं नका. त्यांच्याशीं नेहमीं गोड बोला. ”**

—पवित्र कुराण, १७:२३

वृद्धापकाळीं मनुष्य चिडखोर व्हावयाचा संभव असतो. त्याचप्रमाणें कोठें कसें बोलावें किंवा कोणाशीं केव्हां बोलावें याचें फारसें भान

राहत नाहीं. अशा स्थितींत एखादा उणा शब्द आईबापांच्या तोंडून गेला किंवा त्यांच्या हातून चूक झाली तर त्याबद्दल त्यांचा धिःकार करण्याची किंवा ' घराबाहेर घालवून देईन ' असे धमकीचे शब्द काढण्याची इस्लाम-धर्मानें सक्त मनाई केली आहे. आईबापांच्या वृद्धापकाळच्या चुका क्षम्य आहेत असें समजून त्यांच्याशीं गोड भाषण केलें पाहिजे.

> **" त्यांच्याशीं ( आईबापांशीं ) सहृदयतेनें वागा आणि ' परमेश्वरा, लहानपणीं माझें पालनपोषण करणाऱ्या माझ्या आईबापांवर दया कर, ' अशी प्रार्थना करा. "**
>
> —पवित्र कुराण, १७:२४

आईबापांशीं अत्यंत सौम्यपणानें व मायाळूपणानें वागून त्यांच्या मनाला यत्किंचित्‌हि त्रास होणार नाहीं याविषयीं जागरूक राहिलें पाहिजे. त्यांचा काल आनंदांत जावा, त्यांना कशाहि प्रकारची तसदी पडूं नये म्हणून आपण परमेश्वराची अनन्यभावानें प्रार्थना केली पाहिजे.

> **" स्वर्गांत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्यांनीं प्रथम आपल्या आईबापांस संतुष्ट केलें पाहिजे. "**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

आईबापांस संतुष्ट राखणें हा स्वर्गप्राप्तीचा एक राजमार्ग आहे, असा पुकारा करून इस्लाम-धर्मानें प्रत्येक मुसलमानास निस्सीम मातृ-पितृभक्ति शिकविली आहे. वाटेल तेवढीं पुण्यकृत्यें करणारा पण आपल्या आईबापांस दुखविणारा गृहस्थ स्वर्गांत प्रवेश करूं शकत

नाहीं. आईबापांचा तळतळाट अत्यंत ज्वलज्जहाल असतो. त्या तळतळाटामध्यें मनुष्यांचीं पुण्यकृत्यें जळून खाक होत असतात. आपली ऐहिक व परमार्थिक उन्नति करूं इच्छिणाऱ्यांनीं अशा तऱ्हेचा आईबापांचा तळतळाट न घेतां, त्यांना प्रसन्न ठेवून त्यांचा आशिर्वाद घेण्याची मनीषा बाळगली पाहिजे.

**" आईबापांनीं जरी दुखविलें तरी मनुष्यानें त्यांच्याशीं चांगुलपणाचें वर्तन ठेवलेंच पाहिजे. "**

—हजरत महंमद पैगंबर.

आईबापांनीं आपणांस दुखविलें तरी आपण त्यांना न दुखवितां, त्यांच्याशीं प्रेमळपणाचें वर्तन ठेविलें पाहिजे. त्यांचे आपल्यावर इतके उपकार झालेले असतात कीं, त्या उपकारांतून त्यांच्या चुका वजा केल्या तरी त्यांच्या उपकाराची बाकी डोंगराएवढी राहतेच.

**" मातेच्या पायाखालीं स्वर्ग आहे. "**

—हजरत महंमद पैगंबर.

इस्लाम-धर्माच्या प्रणेत्यांच्या वरील अमर वाक्यावरून तर इस्लाम-धर्मानें आईविषयीं वाटणारा आदर कळसास पोहोंचविला आहे असें प्रत्येकास अंतःकरणपूर्वक कबूल करावें लागेल.

## स्त्रीदाक्षिण्य

**" जितके पुरुषांचे स्त्रियांवर हक्क आहेत, तितके स्त्रियांचे पुरुषांवर आहेत. "**

—पवित्र कुराण, २:२२९

इस्लाम-धर्म स्त्री आणि पुरुष यांमध्यें भेद मानीत नाहीं. पुरुषांना खास हक्क देऊन स्त्रियांना गुलाम बनविण्याचें पुण्यकार्य (?) इस्लाम-धर्मानें कधींहि केलें नाहीं. जितके पुरुषांना हक्क आहेत तितके स्त्रियांनाहि हक्क आहेत. लहर लागेल तेव्हां स्त्रियांच्या हक्कावर पुरुषांस आक्रमण करतां येत नाहीं. स्त्री म्हणजे आपल्या लहरीप्रमाणें वागणारी एक बटीक नसून आपल्या बरोबरीनें वागणारी सन्मान्य व्यक्ति आहे, असें प्रत्येकानें समजलें पाहिजे.

**" स्त्रियांचे हक्क पवित्र आहेत. त्यांना दिलेले हक्क अबाधित राहतील अशी खबरदारी घ्या. "**

—हजरत महंमद पैगंबर.

स्त्रियांना दिलेले हक्क केवळ दिखाऊ आहेत अशी कोणाची कल्पना असेल तर ती चुकीची आहे. स्त्रियांचे हक्क पवित्र व शाश्वत आहेत. त्यांच्या हक्कांची पायमल्ली कोणालाहि करतां येणार नाहीं. त्यांच्या हक्कास बाध येईल असें कोणतेंहि कृत्य न होईल याची दखलगिरी आपण घेतली पाहिजे.

**" स्त्रियांना चांगल्या तऱ्हेनें वागवा अशी परमेश्वराची तुम्हांस आज्ञा आहे. "**

—हजरत महंमद पैगंबर.

इस्लाम-धर्मात स्त्रियांचा दर्जा फार मोठा आहे. तिला पशूप्रमाणें वागविण्याचा किंवा वाटेल त्या वेळीं मारझोड करण्याचा पुरुषाला अधिकार नाहीं. आपण जर स्त्रियांची कुचंबणा करूं, त्यांना वाटेल तसें राबवूं, त्यांना शिवीगाळ करून दुखवूं तर परमेश्वराच्या घरीं आपण गुन्हेगार ठरूं. त्यांना चांगल्या तऱ्हेनें वागवा अशी परमेश्वराची आज्ञा आहे. ही आज्ञा पाळावयाची असल्यास सर्वांनीं स्त्रियांस चांगल्या तऱ्हेनें वागविलें पाहिजे.

**" स्त्रियांना दयाळूपणें वागविण्याची प्रतिज्ञा करा. "**

—हजरत महंमद पैगंबर.

स्त्रियांना न दुखवितां त्यांना अत्यंत दयाळूपणानें वागविलें पाहिजे; इतकेंच नव्हे, तर त्यांना दयाळूपणें वागविणें हा आपला धर्म आहे हें पूर्णपणें लक्षांत घेतलें पाहिजे. तुम्हीं जितके त्यांच्याशीं दयाळूपणें वागाल तितक्या त्या तुमच्याशीं प्रेमानें वागतील. दयाळूपणा सहानुभूति निर्माण करूं शकतो याचा विसर पडतां कामा नये.

**" तुमच्या पत्नीला संतुष्ट राखा. "**

—पवित्र कुराण, ६६:१

आपली पत्नी दुःखी-कष्टी होईल असें वर्तन करूं नये. तिचें अंतःकरण न दुखावेल अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. ती जितकी संतुष्ट राहील, तितकें आनंदी वातावरण ती निर्माण करूं शकेल ही खूणगांठ मनाशीं बांधूनच तिच्याशीं अत्यंत प्रेमळपणानें वागलें पाहिजे. तिला वाटेल तशीं दुरुत्तरें देण्याचा किंवा

तिला कस्पटासमान लेखण्याचा उपक्रम इस्लामच्या दृष्टीनें अत्यंत निषेधार्थ आहे.

> **" मुसलमान म्हणविणाऱ्यानें आपल्या पत्नीचा द्वेष करूं नये; तिच्या एकाद्या खोडीकडे पाहून तो नाखूष असेल तर तिच्या दुसऱ्या सद्‌गुणाकडे पाहून त्यानें प्रसन्न व्हावें. "**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

कोठलीहि स्त्री सर्वगुणसंपन्न असणें शक्य नाहीं. तिच्या वागण्यामध्यें कोठेंना कोठें तरी न्यून राहतेंच; पण त्याकडे लक्ष न देतां तिच्या अंगीं असलेल्या दुसऱ्या सद्‌गुणाकडे पाहून आपण प्रसन्नचित्त व्हावें. तिच्या अंगीं असणारी एखादी खोडच आपण घेऊन बसूं आणि उठल्याबसल्या त्या खोडीची तिला जाणीव करून देऊं तर ती कष्टी व चिडखोर बनल्याखेरीज राहणार नाहीं. एखादी स्त्री भांडखोर असेल पण त्यामुळें नाराज होऊन तिला न दुखवितां तिच्या दुसऱ्या मायाळूपणाच्या सद्‌गुणाकडे पाहून आपण आनंद प्रदर्शित केला पाहिजे. एका गृहस्थानें आपल्या बायकोस कसें वागवावें असें हजरत पैगंबर यांना विचारलें असतां त्यांनीं उत्तर दिलें:—

> **" तुम्हीं ज्या वेळीं खातां त्या वेळीं तिला खावयास द्या, ज्या वेळीं तुम्ही कपडे करतां त्या वेळीं तिलाहि कपडे करा. तिला मारूं नका किंवा शिवीगाळ करूं नका किंवा नाराज होऊन तिच्यापासून विभक्त राहूं नका. "**

स्त्रियांमध्यें सर्वांत विधवांची स्थिति अनुकंपनीय असते. त्यांच्या शिरावरील पतीचें छत्र नाहींसें झालेलें असतें, त्यांचा जगामधला आधार तुटलेला असतो, त्यांचे सौख्य नष्ट झालेलें असतें. वाटेल त्यानें उठावें व त्यांना घालून पाडून बोलावें, वाटेल त्यानें यावें आणि नाक मुरडून जावें अशा असह्य परिस्थितींत त्यांना कालक्षेप करावा लागतो.

**" विधवांची काळजी घ्या. "**

——हजरत महंमद पैगंबर.

अशा दुर्धर अवस्थेंत कालक्रमणा करणाऱ्या विधवांची काळजी घेणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्यांच्या होरपळून गेलेल्या भावनांवर सहानुभूतीची फुंकर घातली पाहिजे. त्यांना कोणींहि दुरुत्तरें न देतां किंवा तुसडेपणानें न वागवितां प्रेमळपणानें वागविलें पाहिजे. त्यांचें शेष आयुष्य आनंदांत जाईल अशी खबरदारी घेतली पाहिजे.

**" जो विधवांच्या आणि अनाथांच्या उदरनिर्वाहाची सोय करतो त्याची योग्यता परमेश्वराच्या सेवेंत रत होणाऱ्या, रात्रभर प्रार्थना करणाऱ्या आणि अखंड उपवास पाळणाऱ्या गृहस्थाइतकीच समजली जाते. "**

——हजरत महंमद पैगंबर.

विधवांच्या उदरनिर्वाहाची सोय लावणारा गृहस्थ पुण्यवान् समजला जातो. परमेश्वराची सेवा करणारास, रात्रभर प्रार्थना करीत बसणारास किंवा अखंड उपवास करणारास जें पुण्य लागतें तितकेंच पुण्य

विधवांना व अनाथांना अन्नदान करण्यानें लाभतें. विधवांना कोणाच्याहि तोंडाकडे न पाहतां इज्जतीनें राहावें असें कोणास वाटत असेल तर प्रथम त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय केली पाहिजे. पोटाची खळगी भरण्याकरितां विधवांनीं कुमार्गास लागूं नये म्हणून, त्यांच्या उदर-निर्वाहाकरितां शक्य तितकी मदत करण्याची बुद्धि बाळगली पाहिजे.

## क्षमा

**“ जे राग आवरून धरतात आणि त्यांचें ( दुख-विणारांचें ) कल्याण करतात ते सदाचारी होत.”**

—पवित्र कुराण, ३:१३३

क्षमा हा मनुष्याचा दिलदारपणा प्रदर्शित करणारा एक मोठा सद्‌गुण आहे. हा सद्‌गुण ज्याच्याजवळ आहे तो मनुष्य उदार व थोर अंतःकरणाचा समजला जातो. त्यानें रागावर विजय मिळविलेला असतो. क्षमा म्हणजे रागाचें दमन आणि औदार्याचें आविष्करण होय. मानवांच्या कल्याणाकरितां क्षमेचा उपयोग करावयाचा असतो. दुसऱ्यानें आपणांस दुखविलें म्हणून मनांत राग धरून त्याचा सूड घ्यावयाचा उपक्रम प्रत्येकानें सुरूं केला, तर समाजांत द्वेष फैलावून त्यामुळें मानवतेची फार मोठी हानि व्हावयाचा संभव असतो. रोजच्या व्यवहारांत एकमेकांना दुखविण्याचे लहानलहान प्रसंग हरहमेष येत असतात; या प्रसंगाचा उपयोग आपण सूड घेण्याकरितां करूं लागलों तर मोठी अनवस्था प्राप्त होईल. असे मानापमानाचे प्रसंग क्षम्य समजून आपणांस दुखविणाराकडे, दयार्द्र दृष्टीनें पाहण्यांतच मोठेपणा आहे. ही दयार्द्रदृष्टि रागाचें दमन करण्यानेंच मनुष्यांत उत्पन्न होते. ज्यानें रागावर विजय मिळविलेला नाहीं, त्याच्या हातून दुसऱ्यास क्षमा करण्याचा मोठेपणा होणें कधींच शक्य नाहीं.

**“ आपल्या सामनेवाल्यास कुस्तींत लोळविणारा**

मनुष्य शक्तिमान् नाहीं तर राग आवरून धरणारा शक्तिमान् होय."

—हजरत महंमद पैगंबर.

राग हा मनुष्यास क्षणांत नामोहरम करणारा बलवान् शत्रु आहे. त्या शत्रूला जिंकून त्याच्यावर विजय मिळविणारा अत्यंत बलवान् समजला जातो. कुस्तीमध्यें आपल्या प्रतिस्पर्ध्यास क्षणांत लोळविणारा दांडगेश्वर बलवान् असतो असें आपणांस कधींच म्हणतां येणार नाहीं. शक्ति ही शारीरिक मजबुतीवर अवलंबून नसून, आत्मिक सामर्थ्यावर अवलंबून असते. शारीरिक सामर्थ्य मिळविणारा गृहस्थ बघतां बघतां रागाच्या आहारीं जातो, पण आत्मिक सामर्थ्य मिळविणारा गृहस्थ रागास आपल्या पचनीं पाडतो. यावरून आत्मिक सामर्थ्य मिळविलेला मनुष्यच खरा बलवान् असतो हें त्रिकालाबाधित सत्य आपणांस मान्य केलें पाहिजे.

आपण रागावर विजय मिळविला म्हणजे तो विजय क्षमेच्या रूपानें दृग्गोचर होतो. दुसऱ्यास क्षमा करणें याचा अर्थच दुसऱ्याबद्दल वाटणारा राग गिळून टाकणें होय. पण नुसता राग गिळून टाकणें यालाच सर्वस्वी क्षमा म्हणतां येणार नाहीं. आपणांस दुखविणारा गृहस्थ आपल्यापेक्षां बलवान् असेल किंवा त्याला शिक्षा करणें आपल्या शक्तीबाहेरील असेल तर त्याच्याविषयीं वाटणारा राग आपण गिळून टाकला तर त्यास क्षमेचें स्वरूप येऊं शकत नाहीं. आपणांस दुखविणारा गृहस्थ आपल्या पूर्ण ताब्यांत सांपडला असेल किंवा त्याला शिक्षा करणें आपल्या हातची गोष्ट असेल, तर मात्र त्या गृहस्थाविषयीं आपण

राग गिळला तर तो मोठेपणा होईल आणि आपण क्षमा केल्याचें खरें पुण्य आपल्या पदरीं पडेल.

हातांत शस्त्र असतां तें न उगारण्यांतच मोठेपणा असतो, त्याचप्रमाणें हातांत सत्ता असतां किंवा अंगांत सामर्थ्य असतां दुखविणारास सोडून देण्यांतच मोठेपणा आहे आणि या मोठेपणालाच क्षमा हा यथार्थ शब्द लावतां येईल.

> **"आपल्या अंगांत (शिक्षा करावयाचें) सामर्थ्य असतां, दुखविणारास क्षमा करणारा गृहस्थ परमेश्वराच्या दृष्टीनें अत्यंत योग्यतेचा आहे."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

आपल्यास ज्यानें दुखविलें त्याला शिक्षा करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं असतां, त्या दुखविणाऱ्या गृहस्थास क्षमा करणें म्हणजे आपल्या सामर्थ्याचा, आपल्या शक्तीचा गौरव करणें होय. आपली शक्ति किंवा सामर्थ्य दुसऱ्याचा सूड घेण्याकरितां वापरतां कामा नये. त्या शक्तीचा उपयोग सूड घेण्याकरितां न करतां क्षमा करण्याकरितां केला तर त्या शक्तीचा खरा सदुपयोग केल्यासारखें होईल. आपल्या शक्तीचा सदुपयोग करणारा किंवा क्षमा करणारा गृहस्थ परमेश्वराच्या दृष्टीनें अत्यंत योग्यतेचा ठरल्यास त्यांत नवल नाहीं

## सहिष्णुता

**" धर्माच्या बाबतींत जबरदस्ती करूं नका. "**

पवित्र कुराण, २ : २५७

धर्माच्या बाबतींत कोठल्याहि प्रकारची जबरदस्ती किंवा जुल्म करण्याची इस्लाम-धर्मानें सक्त मनाई केली आहे. जबरदस्ती करून किंवा धाकदपटशा दाखवून आपला कार्यभाग होईल असें इस्लाम-धर्मास मुळींच वाटत नाहीं. धर्म हा विश्वासावर उभारलेला असतो. जोंपर्यंत आपणांस धर्माविषयीं विश्वास वाटतो, तोंपर्यंत आपण धर्माकडे आपुलकीनें व सहानुभूतीनें पाहतों. जेथें विश्वासच नाहीं, त्या ठिकाणीं धर्माविषयीं प्रेम वाटणें शक्य नाहीं. जबरदस्तीनें विश्वास निर्माण करतां येत नाहीं. धर्माच्या बाबतींत जबरदस्ती करून त्या धर्माबद्दल विश्वास उत्पन्न करणें अत्यंत असंभाव्य आहे अशी इस्लाम-धर्माची प्रामाणिक समजूत आहे.

आपल्या धर्मतत्त्वांचा प्रसार करण्याचा प्रत्येक व्यक्तीला हक्क आहे. पण हा हक्क बजावतांना आपल्याकडून अविवेक, जुल्म किंवा अत्याचार अजिबात होतां कामा नयेत. धर्मप्रसार करतेवेळीं आपण विवेक सोडला, जुल्मजबरदस्ती केली किंवा अत्याचाराचा आश्रय घेतला तर पवित्र कुराणाच्या आज्ञेचा भंग केल्यासारखें होईल. इस्लाम-धर्मास अत्याचार करून मिळविलेलें कलंकित यश नको आहे.

**" शहाणपणानें आणि अत्यंत विचारपूर्वक रीतीनें लोकांना परमेश्वराच्या मार्गाकडे बोलवा. "**

—पवित्र कुराण, १६ : १२५

आपल्या तत्त्वाचा प्रसार करतांना जबरदस्तीचा किंवा अत्याचाराचा अवलंब न करतां, शहाणपणाचा व विचाराचा आश्रय घेतला पाहिजे. जितक्या शहाणपणानें, विचारानें व समतोल वृत्तीनें आपण कार्य करूं, तितकें आपणांस अधिक यश मिळण्याचा संभव आहे. केवळ दंडुक्याच्या जोरावर मारूनमुटकून बनविलेल्या अनुयायांना धर्माबद्दल जिव्हाळा किंवा सहानुभूति कधींहि वाटणार नाहीं याची जाणीव इस्लाम-धर्मास पूर्णपणें आहे, हें वरील व खालील वाक्यांवरून सहज सिद्ध होणार आहे.

**"लोकांनीं तुमचें म्हणणें ऐकिलें नाहीं तर तुमचें काम फक्त उपदेश करीत राहण्याचें आहे."**

—पवित्र कुराण, ३ : १९

आपण केलेल्या उपदेशाची लोकांनीं उपेक्षा केली किंवा आपण मांडलेलीं तत्त्वें त्यांनीं अव्हेरलीं तर चिडून जाऊन "घे बडगा आणि घाल टाळक्यांत" अशी वृत्ति स्वीकारितां कामा नये. लोक आपलें ऐकोत वा न ऐकोत आपलें काम फक्त सदुपदेश करीत राहण्याचें आहे. लोक आपलें ऐकत नाहींत म्हणून त्यांच्यावर एकदम अत्याचार करावयास तयार होणें कधींहि समंजसपणाचें ठरणार नाहीं.

**"अल्लाखेरीज लोकांनीं इतर देव मानले तर त्या देवांना शिवीगाळ करूं नका."**

—पवित्र कुराण, ६ : १०९

धर्माच्या भलत्या अभिनिवेशांत परधर्मीयांच्या देवादिकांविषयीं अपशब्द बोलणें, अश्लील भाषा वापरणें किंवा शिवीगाळीचा अहेर

करणें कधींहि योग्य ठरणार नाहीं. आज आपण त्यांच्या देवांना शिवीगाळ करूं तर उद्यां ते आपल्या परमेश्वरास शिव्या दिल्याखेरीज राहणार नाहींत. शिवीगाळ करण्याची असहिष्णु वृत्ति इस्लाम-धर्मानें निंद्य ठरविली आहे.

परधर्मप्रणेत्यांची किंवा धर्मसंस्थापकांची अवहेलना करणें, त्यांच्या-वर शिंतोडे उडविणें किंवा त्यांची निंदा करणें ही अव्वल दर्जाची असहिष्णुता समजली जाते. या असहिष्णुतेचा इस्लाम-धर्मानें धिक्कार केला आहे. परधर्मप्रणेत्यांबद्दल किंवा पैगंबरांबद्दल प्रत्येक मुसलमानानें आदर बाळगला पाहिजे, असा स्पष्ट आदेश हजरत पैगंबरांनीं दिला आहे; इतकेंच नव्हे, तर त्या पैगंबरावर प्रत्येकानें विश्वास ठेवला पाहिजे, अशी स्पष्ट आज्ञा पवित्र कुराणच्या " अल्-इमरान " या नांवाच्या तिसऱ्या अध्यायांत दिली आहे.

> **" आम्ही या पैगंबरांपैकीं कोणामध्येंहि भेदभाव करीत नाहीं. "**
>
> —पवित्र कुराण, २ : १३६

कोठल्याहि पैगंबरांबद्दल आपण भेदभावाची भाषा बोलतां कामा नये. अमक्या पैगंबरावर विश्वास ठेवणें व अमक्या पैगंबराविषयीं गैरविश्वास प्रगट करणें असा भेदाभेद इस्लम-धर्मास अजिबात पसंत नाहीं. अधःपाताच्या वाटेस लागलेल्या समाजास मागें परतवून त्याचा उद्धार करण्याचें पवित्र कार्य पैगंबर करीत असतात. पैगंबरांच्या उच्च ध्येयाबद्दल व त्यांनीं हातीं घेतलेल्या उज्ज्वल कार्याबद्दल काडीमात्र संशय न घेतां किंवा त्यांच्यामध्यें भेदाभेद न

करतां त्यांच्यावर विश्वास ठेवा, असा सहिष्णुतेचा आदर्शवत् संदेश इस्लाम-धर्मातें दिला आहे.

परधर्मीयाबद्दल किंवा अन्यपंथीयाबद्दल तुच्छता बाळगणें हा एक असहिष्णुतेचा प्रकार आहे. परधर्मीय कितीहि विद्वान् असला, कितीहि कर्तृत्ववान् असला तरी त्याला कस्पटासमान मानण्याची वृत्ति याच असहिष्णुतेच्या पोटीं जन्म घेते. असल्या अधम वृत्तीचा इस्लाम-धर्मानें निषेध केला आहे. मनुष्य कोठल्याहि धर्माचा असो, पंथाचा असो त्याच्या विद्वत्तेस मान दिला पाहिजे, त्याच्या योग्यतेचा मनापासून गौरव केला पाहिजे, त्याची अधिकारवाणी शिरोधार्य मानली पाहिजे.

> **" परमेश्वर, पैगंबर आणि तुमच्या मध्यें असणारीं अधिकारी व्यक्ति यांच्या आज्ञा माना."**
>
> —पवित्र कुराण, ४ : ५९.

आपल्या समाजांत अधिकारवाणीनें बोलूं शकेल अशी एखादी व्यक्ति असते; ही व्यक्ति परधर्मीय आहे म्हणून तिची अवहेलना करणें किंवा ती दुसऱ्या पक्षांतील आहे म्हणून तिच्या अधिकारवाणीचा विपर्यास करून तिचे वाभाडे काढणें किंवा ती हीन कुळांतील आहे म्हणून तिच्याकडे तिरस्कारानें पाहणें या गोष्टी अत्यंत निंद्य व असहिष्णु वृत्ति प्रदर्शित करणाऱ्या आहेत.

> **" एखादा नीग्रो अधिकारवाणीनें बोलूं लागेल तर त्याचें म्हणणें ऐका व त्याच्या आज्ञेचें पालन करा."**
>
> —हज़रत महंमद पैगंबर.

उद्यां जर एखादा काळाकुट्ट शिद्दी आपल्यासमोर उभा राहून अधिकारवाणीनें बोलूं लागेल तर त्याच्या कुळाचा, वंशाचा, जातीचा किंवा दर्जाचा काडीमात्र विचार न करतां त्याचें म्हणणें शिरसावंद्य माना, अशी हजरत पैगंबरांची स्पष्ट आज्ञा आहे.

त्याचप्रमाणें परधर्मीय व्यक्तीबद्दल योग्य आदर प्रदर्शित केला पाहिजे. ती व्यक्ति दुसऱ्या धर्माची अनुयायी आहे म्हणून तिच्यापासून फटकून राहणें, तिच्याकडे जात्यंध दृष्टीनें पाहणें किंवा तिच्याविषयीं अनादर प्रकट करणें या गोष्टी इस्लाम-धर्माच्या दृष्टीनें अत्यंत अयोग्य आहेत. कुणाचेंहि अंतःकरण दुखवूं नये हा इस्लाम-धर्माचा महामंत्र असल्यामुळें वरील असहिष्णु वृत्ति इस्लाम-धर्मास मुळींच पसंत नाहीं. एखाद्या परधर्मीयाची प्रेतयात्रा आपल्यासमोरून गेली तर उभें राहून त्या परधर्मीयाबद्दल आदर प्रदर्शित करा, अशी हजरत पैगंबरांची आज्ञा आहे.

अधिकाराच्या जोरावर परधर्मीयांची कुचंबणा करणें, त्यांच्या आचारविचारांची गळचेपी करणें, त्यांच्या धर्मभावना दुखविणें, त्यांच्यावर जुल्मजबरदस्ती करणें, त्यांना ' त्राही भगवन ' करून सोडणें हें इस्लाम-धर्माच्या उज्ज्वल शिकवणीस सोडून आहे, असें हजरत पैगंबरांनीं परधर्मीयांकरितां काढलेल्या खालील फर्मानावरून सिद्ध होणार आहे:

" ख्रिश्चन लोकांचें जीवित, संपत्ति आणि धर्म यांचें आम्हीं संरक्षण करूं. त्यांच्या चालीरीतींत आम्हीं ढवळाढवळ करणार नाहीं किंवा त्यांच्या धार्मिक समजुती दुखविणार नाहीं. त्यांच्या धर्माध्यक्षांस

पदच्युत केलें जाणार नाहीं. त्यांच्या धर्मप्रचारकांस कुठल्याहि कलमाखालीं बंदी केली जाणार नाहीं. त्यांच्या धर्मचिन्हाचा किंवा क्रॉसचा नाश केला जाणार नाहीं. त्यांच्यावर कशाहि तऱ्हेचा जुलूम होणार नाहीं. त्यांच्यावर जादा कर बसविला जाणार नाहीं किंवा आमच्या सैन्याकरितां त्यांच्या-कडून जबरदस्तीनें साधनसामुग्री वसूल केली जाणार नाहीं."

—हजरत महंमद पैगंबर.

इस्लाम-धर्माच्या सहिष्णुतेचा उत्कृष्ट नमुना म्हणून वरील जाहीर-नामा जगाच्या इतिहासांत चिरंजीव झाल्याखेरीज राहणार नाहीं.

**" तुम्हांस एकाच आईबापांपासून निर्माण केलें आहे."**

—पवित्र कुराण, ४९ : १३

एकाच आईबापांच्या पोटीं जन्म घेतलेल्या व्यक्तींमध्यें कोठल्याहि प्रकारचा भेदभाव असत नाहीं. अमका गोरा, अमका काळा किंवा अमका श्रेष्ठ, अमका कनिष्ठ ही भावनाच त्यांच्यामध्यें असत नाहीं. अमुक एक श्रीमंत म्हणून त्याला मखमलीची खुर्ची, अमुक एक गरीब म्हणून त्याला फाटकें गोणपाट, अमुक एक थोर म्हणून त्याला सोन्याचें ताट आणि अमुक एक कंगाल म्हणून त्याला मातीचा ठिकरा असा पंक्तिप्रपंच कुटुंबांतील माणसांत कधींच केला जात नाहीं. अशीच वृत्ति आपण सर्व समाजाविषयीं बाळगली पाहिजे. आपण सर्व बंधू आहोंत, आपल्या भावना एक आहेत, अशा विचारांचा पगडा आपल्या अंतःकरणावर बसला पाहिजे. गरीबश्रीमंत, उच्चनीच असे कृत्रिम भेदभाव बाळगणें हा गुन्हा आहे, असें मानलें पाहिजे. परमेश्वराजवळ कोठलाच भेदभाव नसतो; त्याला सर्वजण सारखेच. समानतेची ही वृत्ति आपण आत्मसात् केली पाहिजे.

**" मी आपल्यासारखाच एक माणूस आहे. "**

—पवित्र कुराण, १८ : ११०

मनुष्य कितीहि श्रेष्ठ असला तरी त्यानें आपण जगावेगळे आहोंत असें कधींहि समजूं नये. लोकांनीं आपली सेवा करावी, पालखींतून आपली मिरवणूक काढावी, षोडशोपचारें पूजा करावी किंवा आपल्या-

वर चौऱ्या ढाळण्या अशा अहंमन्य कल्पना कधींहि बाळगूं नये. या कल्पना भेदाभेद व उच्चनीचपणा स्पष्टपणें दिग्दर्शित करणाऱ्या असल्यामुळें समतेस अत्यंत विघातक आहेत. त्याचप्रमाणें एखाद्या कुलीन-श्रेष्ठानें ' समाजाच्या अग्रभागीं गादीवर बसण्याचा माझा मान आहे ' असा अट्टाहास कधींहि करूं नये किंवा प्रार्थनेच्या वेळीं उशीरां येऊन चारचौघांना धक्के देत सर्वांच्या पुढें उभें राहण्याचा उद्दामपणा दाखवूं नये. ' मी तुमच्यासारखाच एक माणूस आहें, तुमच्यामध्यें आणि माझ्यामध्यें उच्चनीचपणा नाहीं ' असें प्रत्यक्ष कृतीनें करून दाखविलें पाहिजे. त्रिखंड-कीर्ति हजरत महंमद पैगंबर यांनीं समतेचा उत्कृष्ट धडा आपल्या आचरणानें घालून दिला आहे, हें पवित्र कुराणाच्या वरील वाक्यावरून सहज सिद्ध होण्यासारखें आहे.

समतेचा हा धडा प्रत्येकानें गिरविला पाहिजे. आपण दुसऱ्यापेक्षां उच्च आहोंत असा खोटा अभिमान आपण कधींहि बाळगूं नये किंवा दुसरे लोक आपल्यापेक्षां दर्जानें कमी आहेत म्हणन त्यांना दूर करूं नये.

## ' लोकांना दूर लोटूं नका. '

—पवित्र कुराण, ६ : ५२

आपण कितीहि श्रेष्ठ असलों, श्रीमंत असलों किंवा विद्वान् असलों तरी इतर लोकांना ते आपल्यापेक्षां कमी दर्जाचे आहेत म्हणून त्यांना दूर लोटण्याचें दुष्कृत्य करूं नये. लोकांना दूर लोटणें म्हणजे समतेच्या तत्त्वास हरताळ फांसणें होय. समतेचें दृश्य जगाच्या दृष्टीनें कितीहि चमत्कारिक असलें तरी त्याचा विचार करूं नये. समतेचें

तत्त्व अमलांत आणण्याकरितां आपणांस कितीहि त्रास झाला तरी त्याची फिकीर बाळगूं नये. हजरत पैगंबरांजवळ मोठेपणाचा पोकळ बडेजाव नव्हता. त्यांच्या सभोंवार गोरगरिबांची सदैव गर्दी असे. मक्केतील स्वयंशिष्ट व श्रीमंत कुरेशांनीं हजरत पैगंबरांस सांगितलें कीं, 'आपल्याभोंवतीं असणाऱ्या या कफल्लक लोकांची संगत सोडीत असाल तर आम्हीं आपला इस्लाम-धर्म स्वीकारतों.' हजरत पैगंबरांनीं या गोष्टीचा सक्त इन्कार केला. इस्लाम-धर्मांत गरीब श्रीमंत असा भेदभाव नाहीं. आपण सर्वजण सारखे आहोंत. केवळ तुम्हांला प्रसन्न करण्याकरितां समतेचें तत्त्व झुगारून देऊन, माझ्या गोरगरीब लोकांस मी दूर लोटण्यास तयार नाहीं, असा रोकडा जबाब हजरत पैगंबरांनीं दिला. पवित्र कुराणचें वरील वाक्य सदर प्रसंगास अनुलक्षून आहे.

**" मुसलमान स्त्रीपुरुष परस्परांचे स्नेही आहेत. "**

—हजरत महंमद पैगंबर.

स्त्रीपुरुषांमध्येंहि पूर्ण समता पाहिजे. पुरुषांनीं आपण स्त्रियांपेक्षां श्रेष्ठ आहोंत असें समजूं नये किंवा स्त्रियांपेक्षां आपणाला जास्त हक्क असावेत असा हट्टहि धरूं नये. निसर्गानेंच स्त्रियांना अगदीं कनिष्ठ दर्जाचें बनविलें आहे अशी मूर्खपणाची कल्पना कधींहि बाळगतां कामा नये. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि भावना आहेत, आकांक्षा आहेत ही गोष्ट आपण नीटपणें लक्षांत ठेविली पाहिजे. स्त्री ही गुलाम नसून ती मनुष्याची कर्तृत्वशक्ति आहे असें समजलें पाहिजे. स्त्रीला समान दर्जा प्राप्त झाल्याखेरीज मनुष्याचा जीवनक्रम सुखाचा होणें शक्य नाहीं. स्त्रियांना हाच समानदर्जा प्राप्त करून देण्याकरितां त्यांना

पुरुषांच्या दासी किंवा गुलाम म्हणून न लेखतां स्नेही म्हणून संबोधिलें आहे. स्नेह म्हटला कीं त्या ठिकाणीं समता प्रकर्षानें दिसून येते. स्नेहामध्यें भेदभाव, उच्चनीचपणा यांचा पूर्ण अभाव असतो. स्नेहाकडे समतेचें उत्कृष्ट प्रतीक म्हणून बोट दाखविलें जातें. स्त्री-पुरुषांत स्नेह असणें म्हणजे त्यांच्यांत पूर्ण समता आहे हें सिद्ध करणें होय.

जगाच्या दृष्टीनें गुलाम म्हणजे अत्यंत हीन दर्जाचा प्राणी समजला जातो. गुलामास बरोबरीनें वागविणें म्हणजे स्वतःचा घोर अपमान करून घेणें होय, अशा कल्पना सुधारलेल्या राष्ट्रांत प्रसृत आहेत. या कल्पना इस्लाम-धर्माला विपरीत व अमानुष वाटतात. जगांतील सर्व मानव सारखे आहेत, त्यांच्यामध्यें भेदाभेद नाहींत, सर्वांचा दर्जा सारखा आहे, अशी इस्लाम-धर्माची घोषणा असल्यामुळें इतर मानवांप्रमाणें गुलामांनाहि समतेनें वागविणें हा धर्म आहे, अशी शिकवण इस्लाम-धर्मानें घालून दिली आहे.

**“ तुम्हीं खातां तें अन्न आणि वापरतां तीं वस्त्र-प्रावरणें त्यांना ( गुलामांस ) द्या. ”**

—हजरत महंमद पैगंबर.

बोलण्याचालण्यांत आपण समता दर्शविली तर त्यांत नवल नाहीं; पण ती समता प्रत्यक्ष कृतींत आणून दाखविल्याखेरीज ती चिरस्थायी होऊं शकत नाहीं. गुलामांना तुच्छ न लेखतां आपण खातों तें अन्न आणि वापरतों तीं वस्त्रें त्यांना दिलीं पाहिजेत. आपण पंचपक्वान्नांवर हात मारावयाचा आणि गुलामांच्या तोंडावर चार शिळे तुकडे फेंकावयाचे किंवा आपण उंची पोषाख करावयाचा आणि गुलामांना

फाटक्यीं लक्तरें घालण्याचीं असा पंक्तिप्रपंच इस्लाम-धर्मास मान्य नाहीं. आपण असा भेदाभेद करूं लागलों तर आपल्यामध्यें समता आहे हें कधींच सिद्ध व्हावयाचें नाहीं. गुलाम, नोकर आणि मालक यांचें अन्न व कपडे एक असावेत—याचा अर्थच असा कीं अमुक मनुष्य नोकर आहे व अमुक धनी आहे हें मुळीं जगाच्या निदर्शनासच येऊं नये, आणि त्याची जाणीव त्या दोघांनाहि पण होऊं नये.

**"( तुम्हीं ज्या वाहनावर बसाल ) त्या वाहनावर त्याला बसवा. कारण तो तुमचा भाऊ आहे आणि तुमच्यासारखा त्यालाहि आत्मा आहे."**

—हजरत महंमद पैगंबर.

मालकानें उंटावर बसून जावें आणि गुलामानें त्याच्या मागोमाग पळत सुटावें ही गोष्ट अत्यंत अश्लाघ्य आहे. आपल्याबरोबर पळत असलेल्या गुलामाचे काय हाल होत असतील याची आपणांस पूर्ण जाणीव पाहिजे. गुलाम हा आपला भाऊ आहे, त्यालाहि आत्मा आहे, सुखसंवेदना आहेत हें जाणून त्यास उंटावर बसवून घेतलें पाहिजे.

**"त्याला माझा गुलाम किंवा दासी न म्हणतां माझा मुलगा किंवा मुलगी म्हणून संबोधा."**

—हजरत महंमद पैगंबर.

गुलामाला किंवा दासाला आपण गुलाम किंवा नोकर आहोंत याची तिळमात्र जाणीव होईल असें आचरण आपल्या हातून होऊं नये. हा माझा मुलगा आहे, हा नोकर आहे किंवा ही माझी बटीक आहे असें न संबोधितां हा माझा मुलगा आहे किंवा मुलगी आहे असें

समजलें पाहिजे. ते आपले सेवक आणि आपण त्यांचे धनी हा उच्चनीचभाव आपण अजिबात हुसकून लावला पाहिजे. आपल्या पोटच्या गोळ्याप्रमाणें गुलामांस किंवा नोकरांस लेखिल पाहिजे.

इस्लाम-धर्माच्या या आदर्शभूत समतेमुळेंच गुलामगिरीचें उच्चाटन झालें, अशी इतिहास साक्ष देत आहे.

## दया

> " दया हें धर्माचें चिन्ह आहे. ज्याच्याजवळ दया नाहीं, त्याच्याजवळ धर्म नाहीं. "
>
> —हजरत महंमद पैगंबर.

दयेवरून नेहमीं धर्म ओळखला जातो. ज्या ठिकाणीं दया नाहीं, त्या ठिकाणीं धर्माचें अस्तित्व संभवत नाहीं. ज्या धर्मांत दयेची शिकवण आढळून येत नाहीं, तो धर्म नसून धर्माचें विडंबन आहे, असें खुशाल समजावें. ज्याच्या अंत:करणांत दयेचा मागमूस दिसत नाहीं, अशा गृहस्थानें आपण धर्मनिष्ठ आहोंत असा कितीहि आव आणला तरी तो धर्मनिष्ठ नसून सैतान आहे, असेंच कोणीहि समंजस मनुष्य म्हणणार ! ज्याला दया नाहीं, माया नाहीं, कनवाळूपणा नाहीं, त्याला मनुष्य म्हणावें असें कोणाला देखील वाटणार नाहीं. निर्दयपणें हत्या करीत हिंडणाऱ्या पशूंत आणि दयाहीन माणसांत तत्त्वत: असा कोठलाच फरक असत नाहीं.

मनुष्यत्व अंगीं आणूं इच्छिणाऱ्या सद्गृहस्थानें, खऱ्या धर्माचें पालन करणाऱ्या धर्मनिष्ठानें, दयेचा अंगिकार केला पाहिजे. दया हें माणुसकीचें आणि खऱ्या धर्माचें जीवन आहे. दया ही जातगोत जाणत नाहीं, राष्ट्रीयत्व ओळखत नाहीं, आपपरभाव दाखवीत नाहीं; तिचा धर्म एकच आणि तो म्हणजे मानवता होय. जगांतील यच्चयावत् मानवजातीवर कृपा करणें हें तिचें ध्येय आहे.

आपल्या जातीच्या लोकांचा प्रश्न आला तरच दया दाखवावी,

आणि दुसऱ्या जातीचा प्रश्न आला म्हणजे निष्ठुरता प्रदर्शित करावयाची असा पंक्तिप्रपंच दयेच्या साम्राज्यांत नाहीं.

**“ आपले आईबाप, नातेवाईक, अनाथ मुलें, अडचणींत सांपडलेले लोक, स्वधर्मी आणि परधर्मी शेजारीपाजारी, प्रवासी, स्नेहीसोबती, तुमच्यावर अवलंबून असणारे ( नोकरचाकर वगैरे ) यांच्यावर दया दाखवा.”**

—पवित्र कुराण, ४ : ३६

दयेचा परिघ केवढा विस्तृत असतो हें वरील पवित्र कुराणांतील श्लोकावरून लक्षांत यावयास फारसा वेळ लागणार नाहीं. स्वतःच्या आईबापांपासून तों अडचणींत सांपडलेल्या विधर्मी लोकांपर्यंत सर्वांचा समावेश दयेच्या विस्तारांत झाला आहे. या ठिकाणीं कसलाच भेदाभेद नाहीं. जातगोत, धर्म वगैरे आकुंचित विचारांना मनांत थारा न देतां कृपा करीत राहणें यालाच दया म्हणतां येईल.

दयेचें तत्त्व मनुष्याच्या अंतःकरणावर संक्रांत करण्याकरितां इस्लामचा अवतार आहे. इस्लाम-धर्माचे प्रणेते हजरत महंमद पैगंबर यांनीं दया हेंच आपलें जीवनतत्त्व आहे, असें सर्व जगास जाहीर केलें आहे. परधर्मी शत्रूंनीं त्यांचा छळवाद मांडला असतां, त्यांच्या अनुयायांनीं त्यांना शाप देण्याचा आग्रह करतांच, हजरत पैगंबरांनीं काढलेले नितांत सुंदर शब्द लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणाले:—

**“ मी मानवजातीस शाप देण्याकरितां जन्मास आलों नसून तिच्यावर दया करण्याकरितां अवतरलों आहें.”**

दया हें इस्लाम-धर्माचें ध्येय आहे, हें हजरत पैगंबर यांनीं सिद्ध केलें आहे. हजरत पैगंबरांच्या पावलावर पाऊल टाकीत जाणें हेंच प्रत्येक मनुष्यमात्राचें कर्तव्यकर्म आहे.

> **“ जो परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रावर दया करतो, त्याच्याकडे परमेश्वर दयार्द्र-दृष्टीनें पाहतो; जगांतील प्रत्येक व्यक्तीवर, मग ती वाईट असो कीं चांगली असो, दया करा. वाईट माणसांवर दया करणें ह्मणजे वाईटपणापासून त्या माणसांस परावृत्त करणें होय. ”**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

वरील वाक्यांत दयेचें विशाल क्षेत्र हजरत पैगंबरनीं पुन्हां एकवार विशद करून दाखविलें आहे. प्रत्येक व्यक्तीवर आपण दया करावीच, पण दया करतांना चांगला व वाईट माणूस असा भेदाभेद करतां कामा नये. चांगल्या माणसांवर कोणीहि दया करील. पण जगानें तुच्छ म्हणून संबोधिलेल्या वाईट माणसांवर आपण दया केली पाहिजे. वाईट माणसांवर दया करून आपण त्यांस लाजविलें पाहिजे. दया ही वाईट माणसाचें पापी अंतःकरण निर्मळ करून टाकते; कधींहि न द्रवणाऱ्या त्याच्या अंतःकरणामध्यें ऋजुता निर्माण करते.

दया अनेक मार्गांनीं प्रदर्शित करतां येते. संकटांत सांपडलेल्या गरिबांना मदत करणें, अनाथ मुलांचा संभाळ करणें, अन्नान्नदशा झालेल्या लोकांना अन्नदान करणें, आजारी माणसांस मदत करून त्यांना धीर–भरंवसा देणें, मजुरांचे श्रम कमी करण्यास झटणें, वगैरे

अनेक मार्गांच्या द्वारें मनुष्य दया दाखवूं शकतो. आईबाप नसलेल्या अनाथ मुलांचा संभाळ करण्यांत व त्यांच्यावर दया दाखविण्यांत फार मोठें पुण्य आहे. जगामध्यें त्यांना कोठेंहि आधार नसतो, मायेनें त्यांना जवळ बोलावून त्यांचें कोडकौतुक करण्यास कोणी असत नाहीं, त्यांच्याशीं गोड बोलून त्यांचा दु:खभार हलका करणारा कोणी भेटत नाहीं. अशा अनाथ व पोरक्या मुलांना आपल्या घरीं आणून त्यांना प्रेमानें वागविण्याची इस्लाम-धर्मानें शिकवण दिली आहे.

> **" ज्या घरांत अनाथ मुलांविषयीं दक्षता बाळग-ण्यांत येते तें घर उत्कृष्ट होय; आणि ज्या घरांत अनाथ मुलांना वाईट रीतीनें वागविण्यांत येतें तें घर वाईट होय."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

ज्या घरामध्यें किंवा कुटुंबामध्यें अनाथ मुलांचा चांगल्या रीतीनें प्रतिपाळ होत असतो, तें घर किंवा तें कुटुंब धन्य होय. अशा कुटुंबांत कशाचीहि ददात पडत नाहीं. परमेश्वर अशा कुटुंबास अनेक संकटांतून सोडवितो. ज्या कुटुंबामध्यें अनाथ मुलांचे हाल होतात, त्यांना दुरुत्तरें सहन करावीं लागतात, त्या कुटुंबाचा हजरत पैगंबरनीं धिक्कार केला आहे. अनाथ मुलांचा संभाळ आपल्या पोटच्या मुलाप्रमाणें करणारा गृहस्थ थोर समजला जातो. परमेश्वराच्या दृष्टीनें अशा गृहस्थाची फार मोठी योग्यता असते.

> **" अनाथ मुलांना त्यांची संपत्ति परत द्या; त्यांच्या**

**चांगल्या वस्तू बदल करून वाईट देऊं नका, किंवा त्यांची संपत्ति गिळंकृत करूं नका. "**

—पवित्र कुराण, ४:२

कित्येक गृहस्थ अनाथ मुलांचा संभाळ करण्याचें ढोंग करतात. त्यांची दृष्टि मुलांचा संभाळ करण्याची नसून संभाळ करण्याच्या मिषानें अनाथ मुलांची संपत्ति गिळंकृत करण्याकडे खिळलेली असते. अशा ढोंगी व लुच्च्या गृहस्थांचा इस्लाम-धर्मानें कडक शब्दांत धिक्कार केला आहे. आपण ज्यांचा प्रतिपाळ करितों त्या अनाथ मुलांची कांहीं संपत्ति असेल तर त्यांत अफरातफर न करितां त्यांना परत दिली पाहिजे. त्याचप्रमाणें त्यांच्या चांगल्या जिनसांची अदला-बदल करून, नगास नग म्हणून वाईट जिन्नस कधींहि देतां कामा नये. त्यांच्या संपत्तीचा अपहार न करितां तें सज्ञान झाल्यावर ती संपत्ति परत दिली पाहिजे. अनाथ मुलांची संपत्ति किंवा जिन्नस बळकावून बसणें इस्लाम-धर्माच्या दृष्टीनें मोठा गुन्हा आहे.

मजुरांच्या शक्तीबाहेर त्यांना काम न देणें ही देखील दया आहे. अमुक एक मजूर आहे आणि त्याच्याकरितां पैसे मोजलेले आहेत, त्यानें जिवाकडे न पाहतां काम केलेंच पाहिजे अशी निर्दयता न दाखवितां, तो मजूर आहे पण त्याला देखील जीव आहे, त्याची शक्ति पाहून त्याला काम दिलें पाहिजे, ही मानवतेची भावना आपल्या अंतरीं बाणली पाहिजे.

**" ते दमून जातील अशा तऱ्हेचे श्रम, त्यांचेकडून करून घेऊं नका आणि ते श्रम करून घेणें अपरिहार्य**

**असलें तर त्यांच्या कामांत तुम्ही स्वतः हातभार लावा."**

—हजरत महंमद पैगंबर.

काम करितां करितां मजूर थकला तर त्याला विसावा न देतां त्याच्याकडून काम करून घेणें माणुसकीला सोडून आहे. त्याला देऊं केलेल्या मजुरीचा विचार न करितां त्याच्या भावनाकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. त्याला विलक्षण त्रास होत असतां त्याच्याकडून सारखें काम करून घेणें म्हणजे आपण निर्दय आहोंत असें सिद्ध करणें होय.

अगदीं नाइलाज म्हणून त्याच्याकडून त्याच्या शक्तीबाहेरचें काम करून घेणें भाग पडलें तर त्याच्या कामास आपण स्वतः हातभार लावला पाहिजे. **हजरत महंमद पैगंबर यांनीं स्वतः आपल्या डोक्यावरून दगड वाहून, आपल्या थकलेल्या मजुरांस विसावा दिला होता,** ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. मजुरांस हातभार लावतांना आपल्या मोठेपणाचा किंवा थोरपणाचा काडीमात्र विचार करितां कामा नये. थकलेल्या दमलेल्या मजुरांचे श्रम कमी करून त्यांना विसावा देणें हें आपलें पवित्र कर्तव्य समजलें पाहिजे.

**"ज्यांचें अंतःकरण सत्यनिष्ठ, पवित्र आणि दयाशील असेल त्यांना स्वर्गाच्या उद्यानांत प्रवेश मिळेल."**

—हजरत महंमद पैगंबर.

अशा तऱ्हेचें दयाशील अंतःकरण ज्या गृहस्थाला आहे तो

मानवतेचा सेवक समजला जातो. मानवांचीं दुःखें आपल्या दयाशील वृत्तीनें दूर करून त्यांचें आयुष्य सुखमय करण्याचा तो अव्याहत प्रयत्न करीत असतो. अशा दयाशील थोर गृहस्थास स्वर्गाचें दार सताड उघडें असल्यास नवल तें काय ?

## औदार्य

**" जे अहोरात्र गुप्तपणें अगर उघडपणें दानधर्मांत पैसा खर्चतात, त्यांना परमेश्वराकडून मोबदला मिळतो; त्यांच्यावर भिण्याची किंवा पश्चात्ताप करण्याची पाळी कधींच येत नाहीं."**

—पवित्र कुराण, २ : २७४

दयेच्या पोटीं औदार्याचा जन्म असतो. अंतःकरणांत दयेचा प्रादुर्भाव झाल्याखेरीज औदार्याची कल्पना मूळ धरीत नाहीं. औदार्य ही माणसाच्या दयाशील अंतःकरणाची खूण आहे. आपला पैसा आपल्याकरितांच खर्च न करतां त्याचा उपयोग गोरगरिबांच्या व गरजूंच्या कल्याणाकरितां खर्च करणें औदार्यवान् आपलें कर्तव्यकर्म समजतो. अशा दृष्टीनें पैसा खर्च करणारास परमेश्वराकडून या नाहीं त्या मार्गानें मोबदला मिळतोच. आपण आज मानवांच्या सुखाकरितां पैसा खर्च केला तरी तो पैसा वांया गेला असें मात्र कोणीं समजूं नये. आज नाहीं उद्यां तो पैसा अन्य मार्गानें पुन्हां आपल्याजवळ येतोच. औदार्यवान् माणसास परमेश्वर कधींच कमी करीत नाहीं, असें जें थोरांचें वचन आहे तें सत्य आहे.

**" जे खरे नीतिमान् असतात ते परमेश्वरास प्रसन्न करण्याकरितां आपल्या पैशांतून नातेवाईकांना मदत करतात, अनाथ मुलांचा संभाळ करतात, गरजवंतांच्या अडचणी दूर करतात आणि प्रवासी,**

**गरजू, व अन्यायानें तुरुंगांत पडलेल्या बंदीवानांस सोडविण्याकरितां पैसा खर्च करतात आणि जे कर्ज भागवावयास असमर्थ आहेत त्यांचें कर्ज फेडतात."**

—पवित्र कुराण, २ : १७७

वर सांगितलेल्या निरनिराळ्या मार्गांनीं औदार्य दाखविणारे हे खरे नीतिमान व सच्छील असतात. आपल्या नजरेसमोर घडत असलेले असंतोषाचे प्रकार त्यांना पाहवत नाहींत, दुसऱ्यास होत असलेलें दुःख त्यांना सहन करवत नाहीं; त्या दुःखांतून जनतेस सोडविण्याकरितां ते आपल्या पैशाचा सद्व्यय करतात.

अशा तऱ्हेनें औदार्य प्रत्येकानें दाखवून जनतेचीं दुःखें कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. औदार्य दाखवितांना थोर व निरपेक्ष मनोवृत्ति प्रदर्शित करणें अत्यंत जरूरीचें आहे. लोकांना दाखविण्याकरितां पैसा खर्च करणें म्हणजे औदार्य नव्हे. गरजूंना पैसा देतांना त्यांना निंदास्पद रीतीनें वागविणें हें देखील औदार्यास सोडून आहे.

**"निंदा करून, दुखवून किंवा लोकांना दाखविण्याकरितां पैसा खर्च करून औदार्याची किंमत कमी करूं नका."**

—पवित्र कुराण, २ : २६४

मनुष्यावर वाईट प्रसंग आला म्हणजे तो लाचार बनतो. असा मनुष्य मदत मागण्याकरितां आपल्याकडे आला म्हणजे त्याच्या मनाला लागेल अशा प्रकारचे उद्गार काढून नंतर आपण त्यास मदत केली तर त्या औदार्याची किंमत कमी होत असते. आपल्याकडे आलेल्या गरजू गृह-

त्याची चूक न दाखवितां किंवा त्याला निंदास्पद बोलणीं न ऐकवितां उदार अंतःकरणानें मदत केली पाहिजे आणि त्याला समाधान वाटेल अशा प्रकारची वागणूक ठेविली पाहिजे. त्याचप्रमाणें मनुष्याला बरेच हेलपाटे घालण्यास लावून नंतर त्याला मदत करणें म्हणजे त्रास देऊन नंतर त्याच्यावर उपकार करण्यासारखें आहे. अशा तऱ्हेचे केलेले उपकार सार्थ ठरत नाहींत.

ज्यांच्याजवळ अजिबात पैसा नाहीं, त्यांनीं औदार्य दाखविलेंच पाहिजे अशी इस्लाम-धर्माची जबरदस्ती नाहीं. ज्यांच्याजवळ पैसा आहे, त्यांनीं मात्र औदार्य दाखविलेंच पाहिजे अशी इस्लाम-धर्माची आज्ञा आहे.

> **"ज्यांच्याजवळ भरपूर पैसा आहे त्यांनीं औदार्य दाखवावें, ज्यांच्याजवळ थोडा पैसा आहे, त्या मानानें त्यांनीं ( लोककल्याणाकरितां ) पैसा खर्च करावा; परमेश्वर कोणावरहि बोजा टाकीत नाहीं."**
>
> —पवित्र कुराण, ६५ : ७

ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें धर्म केला पाहिजे. अत्यंत धनवान् असेल तर त्यानें सढळ हातानें धर्म करावा. ज्याच्याजवळ थोडा पैसा असेल त्यानें त्या प्रमाणांत धर्म केला पाहिजे. ज्यांच्याजवळ पैसा नाहीं त्यांनीं कशा प्रकारचें आचरण करून औदार्याचें पुण्य संपादन करावें याचा ऊहापोह आपण पुढें करणारच आहोंत.

मनुष्याजवळ संपत्ति असून त्याचा सद्व्यय न करतां किंवा लोक-कल्याणाकरितां न खर्च करितां तो कंजूषपणानें वागूं लागला तर

त्याचा कंजूषपणा निषेधार्ह आहे. कंजूष माणूस इस्लाम-धर्मात अत्यंत तुच्छ समजला जातो. अशा माणसास समाजांत कधींच मान मिळत नाहीं. कंजूष माणसाशीं संबंध ठेवण्यांत देखील खऱ्या मुसलमानास लाज वाटते.

**" जे कंजूष आहेत आणि दुसऱ्यास कंजूष बना असा उपदेश करतात आणि परमेश्वरानें दिलेली संपत्ति लपविण्याचा प्रयत्न करतात, त्यांचा लाजिरवाणा शेवट होत असतो. "**

—पवित्र कुराण, ४ : ३७

अपार संपत्ति परमेश्वरानें दिली असतां, कंजूष माणूस आपल्याजवळ फुटकी कवडीहि नाहीं असें बेधडक सांगत असतो. असें धडधडीत खोटें बोलणाऱ्या कंजूष माणसाचा शेवट कधींच चांगला होत नाहीं. स्वतः सुखानें कालक्रमणा करावयाची ज्यांची छाती होत नाहीं, ते दुसऱ्याच्या कल्याणाची व सुखाची पर्वा करणें कधींच शक्य नाहीं. आपल्या स्वतःविषयीं, कुटुंबांतील मंडळीविषयीं आणि जनतेविषयीं उदासीन राहून कवडी कवडी सांठवून ठेवणाऱ्या कंजूष माणसाची इतिश्री लाजिरवाणी व्हावी हें साहजिक आहे.

निष्कांचन मनुष्यानेंहि औदार्य दाखविलें पाहिजे, अशी इस्लाम-धर्माची आज्ञा आहे. पण हें औदार्य पैशाचें नसून कृतीचें आहे. प्रत्येक सत्कृत्य हें औदार्य ठरतें. दानधर्म करणाऱ्या श्रीमंत माणसास औदार्याचें पुण्य जितकें मिळतें तितकेंच गरीब माणसास सत्कृत्य करून पुण्य मिळूं शकतें. प्रत्येक मनुष्य दिलदार अंतःकरणाचा झाला

पाहिजे, त्याच्या हातून मानवजातीचें कल्याण झालें पाहिजे, हीच कल्पना औदार्याच्या बुडाशीं आहे. या दृष्टीनें पैसा खर्च करण्याची ताकत नसलेल्या गरिबांच्या हातून सत्कृत्याच्या रूपानें मानवजातीची सेवा घडली तर त्या सत्कृत्याला औदार्य म्हणणें प्राप्त आहे.

**" औदार्य हें मुसलमांनाचें कर्तव्यकर्म आहे. ज्यांच्याजवळ पैसा नाहीं, त्यांनीं सत्कृत्य करणें किंवा अपकृत्यापासून दूर राहणें म्हणजेच औदार्य होय. "**

—हजरत महंमद पैगंबर.

गरीब मुसलमान गृहस्थानें सत्कृत्य करून औदार्याचें पुण्य पदरीं घेतलें पाहिजे. सत्कृत्य करावयाचेंहि सामर्थ्य त्याच्या अंगीं नसेल तर निदान वाईट कृत्यापासून त्यानें अलिप्त तरी राहावें. वाईट कृत्यापासून मानवजातीला त्रास भोगावा लागतो म्हणून वाईट कृत्यापासून परावृत्त होणें म्हणजे देखील औदार्य आहे. औदार्याची व्याख्या अत्यंत विस्तृत करून प्रत्येक व्यक्तीनें औदार्यवान् झालें पाहिजे, असा इषारा इस्लाम-धर्मानें केला आहे.

**" लोकांना सन्मार्गावर आणण्याकरितां उपदेश करणें म्हणजे औदार्य होय; चुकलेल्या वाटसरूस वाट दाखविणें म्हणजे औदार्य; आंधळ्यापांगळ्यांना दानधर्म करणें म्हणजे औदार्य; रस्त्यावर पडलेले काटेकुटे काढून टाकणें म्हणजे औदार्य; तहान-**

लेल्यांना पिण्यास पाणी देऊन तृप्त करणें म्हणजे औदार्य; दोन लोकांमधला न्याय करणें म्हणजे औदार्य; अशक्त लोकांचा बोजा उचलणें म्हणजे औदार्य; मूक प्राण्यांना दयाळूपणानें वागविणें म्हणजे औदार्य; आपल्या बंधूचें स्मितपूर्वक स्वागत करणें म्हणजे औदार्य, उल्हासानें स्नेह्यांसोबत्यांना भेटणें व त्यांना मेजवानी देणें म्हणजे औदार्य; शेजाऱ्यापाजाऱ्यांना भेटी पाठविणें म्हणजे औदार्य; पांथस्थाला जेवण घालून तृप्त करणें म्हणजे औदार्य; लहान बालकांना लडीवाळपणानें वागवून त्यांचें प्रेमानें चुंबन घेणें म्हणजे औदार्य; पत्नीस ममतेनें वागविणें म्हणजे औदार्य होय."

—हजरत महंमद पैगंबर.

हजरत महंमद पैगंबरांचे वरील उद्गार वाचले म्हणजे इस्लामधर्मांत औदार्याची व्याप्ति केवढी मोठी आहे हें सहज कळून येईल. हजरत पैगंबरांचे उद्गार नुसते ऐकून किंवा वाचून सोडून द्यावयाचे नाहींत; ते अमलांत आणून दाखविले पाहिजेत. पवित्र कुराणामधील श्लोकाइतकीच हजरत पैगंबरांच्या वचनांची योग्यता आहे. वरील वाक्यांमधील प्रत्येक शब्दन्शब्द मानवजातीबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीनें व प्रेमानें ओथंबलेला आहे. अनोळखी व्यक्तीपासून घरच्या मुलांबाळांपर्यंत प्रत्येकानें किती प्रेमाचें आचरण ठेविलें पाहिजे याचा स्पष्ट खुलासा कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखा आहे. दुःखानें जर्जर

झालेल्या, संकटांनीं ग्रासलेल्या, अडचणींनीं मेटाकुटीस आलेल्या, जुलमानें त्रस्त झालेल्या मानवांस सुखाचा, समाधानाचा आणि शांतीचा लाभ करून देऊन त्यांचें जीवित आनंदित करणें हेंच औदार्याचें ध्येय ठरत नाहीं काय ?

## मानवता

"अखिल मानवजातीच्या उद्धाराकरितां तुम्हांस पाठविलें आहे."

—पवित्र कुराण, ३४ : २८

फक्त आपल्या धर्मातील लोकांचा उत्कर्ष करावा, त्यांनाच सौख्य आणि समाधान मिळवून द्यावें, अशा तऱ्हेचें आकुंचित ध्येय इस्लाम-धर्मानें कधींहि स्वीकारलें नाहीं. जगांतील यच्चयावत् व्यक्ति, मग ती कुठल्याहि धर्माची असो, कुठल्याहि देशाची असो, कुठल्याहि पंथाची असो तिच्या मदतीला धांवून जाऊन तिला संकटमुक्त करणें, तिच्यावर आलेलें गंडांतर टाळण्याकरितां अविश्रांत परिश्रम करून तिला सौख्याची प्राप्ति करून देणें किंवा तिच्यावर होत असलेला जुलूम नष्ट करून तिचें आयुष्य आनंदित करणें हें मानवतेचें उज्ज्वल ध्येय इस्लाम-धर्मानें आपल्यासमोर ठेविलें आहे. अखिल मानवजातीचा दुःखपरिहार ज्या मार्गांनीं होईल ते मार्ग चोखाळण्यांत इस्लाम-धर्मास धन्यता वाटते.

**"अखिल मानवजात म्हणजे एक राष्ट्र आहे."**

—पवित्र कुराण, २ : २१३

अखिल मानवजात सर्व जगभर जरी विखुरली असली तरी तिच्याकडे एकराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें आपण आपल्या राष्ट्रबांधवांच्या उत्कर्षाकरितां मनोभावानें झटतों, त्यांच्या सौख्याकरितां अहोरात्र खपतों, त्यांच्या कल्याणाकरितां

अविश्रांत परिश्रम करतो त्याचप्रमाणें जगांतील सर्व मानव हे एकाच राष्ट्रांतले आहेत असें समजून त्यांचा उत्कर्ष व्हावा, त्यांना सौख्य लाभावें, त्यांचें कल्याण व्हावें अशी सदिच्छा आपण बाळगली पाहिजे आणि तशी आपल्या आयुष्याची दिशा आंखली पाहिजे.

**" चांगल्या तऱ्हेनें वागा आणि उपद्रवी लोकांचा मार्ग अनुसरूं नका. "**

—पवित्र कुराण, ७ : १४२

आपल्या वागणुकीनें लोकांना समाधान पोहोंचेल अशा तऱ्हेची वागणूक आपण ठेविली पाहिजे. लोकांना त्रास होईल किंवा त्यांचीं मनें दुखावतील असें आचरण आपण अजिबात करतां कामा नये. लोकांना उपद्रव देणाऱ्या दुष्ट माणसांचा मार्ग न अनुसरतां लोकांना सुख देणाऱ्या सज्जन माणसांच्या मार्गावर आपण पदार्पण केलें पाहिजे.

**" दुष्टपणा, अन्याय आणि जुल्म यांपासून तुम्ही दूर रहा, अशी परमेश्वराची आज्ञा आहे. "**

—पवित्र कुराण, १६ : ९०

मानवांना दुष्टपणानें दुखावणें, अन्यायानें सतावणें आणि जुलमानें गांजून टाकणें हीं अमानुष कृत्यें अघोर पातकांत समाविष्ट होतात. अशा पातकांमुळें सबंध मानवजात हैराण होते म्हणून त्यांपासून चार हात दूर राहण्याची परमेश्वराची स्पष्ट आज्ञा आहे.

**" जुल्म करण्याकरितां दुसऱ्याची मदत मागणारा, किंवा आपल्या पक्षाकरितां अन्यायानें झगडणारा**

**किंवा अनाचार करणाऱ्या पक्षाला मदत करतांना मरणारा गृहस्थ आमच्यापैकीं नव्हे.''**

—हजरत महंमद पैगंबर.

लोकांवर जुलूम करण्याकरितां दुसऱ्याची निर्लज्जपणें मदत मागणारा गृहस्थ इस्लाम-धर्माचा अनुयायी होऊं शकत नाहीं. आपल्या पक्षाकडून धडधडीत अन्याय होतो आहे हें माहीत असतांना देखील त्या अन्यायी पक्षाची बाजू घेऊन झगडणाऱ्या गृहस्थास तो इस्लाम-धर्माचा पुरस्कर्ता आहे असें आपणांस कधींच म्हणतां यावयाचें नाहीं. वाटेल तो अनाचार करणाऱ्या टोळीस मदत करीत असतां प्राणास मुकणारा गृहस्थ—मग तो कितीहि निधडा व शूर असो—मुसलमान म्हणविण्याच्या योग्यतेचा नाहीं. त्याचा पराक्रम, त्याचें शौर्य, त्याची शक्ति हीं मातीमोल समजलीं जातात. त्यानें केलेली मदत अनाठायीं व अव्यवहार्य समजली जाते.

**" दुसऱ्यांना न्याय व चांगुलपणा या बाबतींत मदत करा; पण अन्याय आणि दुष्टपणाच्या बाबतींत मदत करूं नका.''**

—पवित्र कुराण, ५ : २

आपण एकमेकांना अवश्य मदत केली पाहिजे, एकमेकांस अवश्य हातभार लावला पाहिजे, पण तो कशाकरितां? अन्यायाकरितां नव्हे, एकमेकांचें वाटोळें करण्याकरितां नव्हे, एकमेकांचे गळे कापण्या-करितां नव्हे तर एकमेकांना सुख देण्याकरितां, एकमेकांच्या कल्याणाकरितां, एकमेकांच्या उत्कर्षाकरितां! अन्यायास आपण

अजिबात हात लावतां कामा नये किंवा वैऱ्याचा दावा साधण्याकरितां कोणासहि मदत देऊन उपयोगी नाहीं. आपल्या हातून कोणाचेंहि नुकसान चुकून देखील होऊं नये अशी खबरदारी घेतली पाहिजे, इतकेंच नव्हे, तर कोणाचेंहि मन दुखावेल असें कृत्य न करण्याची आपण काळजी घेतली पाहिजे.

**" आपल्या कृतीनें अगर वाचेनें मानवजातीस जो दुखवीत नाहीं तो मुसलमान होय."**

—हजरत महंमद पैगंबर.

इस्लाम-धर्माचा ज्याला अभिमान आहे, आपण सच्चे मुसलमान आहोंत अशी ज्यांना जाणीव आहे त्यांच्या हातून मानवजातीस दुख-विण्याचें पाप घडतां कामा नये. कृतीनें तर राहोच, पण वाचेनें देखील मानवांना न दुखविण्याचें अहिंसाव्रत प्रत्येक मुसलमानानें स्वीकारलें पाहिजे. आपण कुणासहि दुखविलें नाहीं म्हणजे आपलें कार्य संपलें असें म्हणून स्वस्थ मात्र बसूं नये. जे दुसऱ्यांकडून दुख-विले गेले आहेत त्यांच्या मदतीला, त्यांच्या साहाय्याला धांवून जाणें हें प्रत्येकाचें आद्य कर्तव्य आहे.

**" गांजलेले अथवा त्रस्त झालेले कोणीहि असोत—ते मुसलमान असोत अगर मुसलमानेतर असोत—त्यांना साह्य करा. "**

—हजरत महंमद पैगंबर.

जे परिस्थितीनें गांजून गेले आहेत अथवा दुसऱ्या पशुतुल्य नर-राक्षसांकडून त्रस्त झाले आहेत, अशा हीन-दीन लोकांना साहाय्य

करण्याकरितां आपण प्रथम पुढें झालें पाहिजे. या लोकांना साहाय्य करतेवेळीं जात, धर्म किंवा पंथ याचा काडीमात्र विचार करतां कामा नये. अमुक एक मुसलमान आहे म्हणून त्याला मदत करावयाची आणि अमुक एक परधर्मी आहे म्हणून त्याला मदत करण्यापासून परावृत्त व्हावयाचें असा पंक्तिप्रपंच इस्लाम-धर्म अजिबात मानीत नाहीं. मानवजातीची सेवा हें इस्लाम-धर्माचें ध्येय असल्यामुळें जातिधर्मासारख्या आकुंचित व विघातक भावनांना इस्लाम–धर्मांत जागा नाहीं.

> " त्रस्त झालेल्यांचीं अंतःकरणें प्रफुल्लित करणें, दुःखी-कष्टी लोकांचीं दुःखें दूर करणें यांपासून पुण्य मिळतें."

—हजरत महंमद पैगंबर.

आपपरभाव न ठेवतां दुःखी-कष्टी लोकांच्या वेदना नष्ट करण्याची आपण शिकस्त केली पाहिजे. आपणांस पुण्य लाभावें अशी आपली सदिच्छा असेल तर त्याकरितां आपणांस एकच गोष्ट केली पाहिजे आणि ती म्हणजे दुःखितांचा दुःखपरिहार. त्याबरोबरच त्यांचीं कोमेजलेलीं अंतःकरणें प्रफुल्लित करण्याचा आपण शक्य तेवढा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या विषण्ण वृत्तींत थोडी कां होईना आनंदाची झुळूक निर्माण करण्याची मनीषा बाळगली पाहिजे. दुःखी व त्रस्त लोकांच्या मनोवृत्ति आनंदित करणें हें एक प्रकारचें पुण्यच आहे.

आपल्याशीं संबंध येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या भावना आपल्या गोड आचरणानें उल्हसित करून तिला आनंदित करण्याचा प्रयत्न आपण नेहमीं केला पाहिजे. थोडा वेळ जरी त्या व्यक्तीला आपल्या दुःखाचा

किंवा काळजीचा विसर पडला तर आपल्या हातून एक मोठें पुण्यकर्म झालें अशी भावना आपण बाळगली पाहिजे.

**"ज्या वेळीं तुम्हीं रोग्याच्या समाचाराकरितां जातां त्या वेळीं समाधानाच्या गोष्टी करून त्याला दुःखाचा विसर पाडा आणि 'तूं लवकर बरा होऊन पुष्कळ वर्षें जगशील' असा धीर–भरंवसा द्या. तुमच्या बोलण्यानें जें होणार आहे तें टळणारें नसलें, तरी त्यामुळें त्याच्या मनाला थोडीतरी प्रसन्नता येईल."**

—हजरत महंमद पैगंबर.

आपण एखाद्या रोग्याच्या समाचारास गेलों तर त्या रोग्याला समाधान वाटेल, त्याला विरंगुळा पडेल, त्याला आनंद होईल अशा तऱ्हेचा धीर–भरंवसा गोड शब्दांनीं दिला पाहिजे. रोगी आसन्नमरण झाला, त्याच्याविषयींच्या सर्व आशा सुटल्या तरी आपण त्याला धीर दिला पाहिजे. आपण दिलेल्या धीरानें आणि गोड शब्दानें त्या बिचाऱ्याचे शेवटचे क्षण तरी आनंदांत गेले याबद्दल आपल्यास थोडें कां होईना समाधान वाटेल.

**" तुम्ही एकमेकांशीं प्रेमानें वागल्याखेरीज तुमचा धर्म परिपूर्ण होत नाहीं. "**

——हजरत महंमद पैगंबर.

सर्वांशीं सहृदयतेनें आपणास वागावयाचें असेल तर आपण प्रथम प्रेमळ बनलें पाहिजे. आपल्या अंतःकरणांत प्रेमळपणाचा ओलावा उत्पन्न झाल्याखेरीज दुसऱ्यांशीं सहृदयतेनें आपणांस वागतां येणार नाहीं.

एकमेकांविषयीं प्रेमानें वागणें याचा अर्थच सहृदयता प्रदर्शित करणें होय. प्रेमळ आचरण हें धर्मास पूर्णत्व आणणारें एक महान् साधन आहे, असें आपण समजलें पाहिजे. धर्माचें महत्त्व वरवरच्या सोहळ्यांवर किंवा नुसत्या देखाव्यावर अवलंबून नसतें. आपल्या अंतःकरणाच्या विकासावर धर्माचें मोजमाप घेतलें जातें. आपल्या अंतःकरणाचा विकास झाला म्हणजे आपल्या हातून धर्माचें पालन परिपूर्ण झालें असें आपण समजलें पाहिजे. सर्वांशीं प्रेमानें वागणें हें अंतःकरणाच्या विकासाचें दृश्य चिन्ह आहे.

> **"ज्या वेळीं तुम्हीं परमेश्वरासमोर उभे रहाल त्या वेळीं तुम्हीं आपल्या मुलांबाळांवर, नातेवाईकांवर, शेजाऱ्यांपाजाऱ्यांवर आणि मानवजातीवर प्रेम केलें आहे किंवा नाहीं हें तो प्रथम पाहील."**
>
> —हजरत महंमद पैगंबर.

परमेश्वराशीं आपली ओळख व्हावी अशी सद्भावना बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें प्रथम मानवजातीवर प्रेम करावयास शिकलें पाहिजे. परमेश्वर हा मनुष्याच्या बडेजावीचा भोक्ता नाहीं. परमेश्वराला पहावेंसें वाटतें तें मनुष्याचें प्रेमळ अंतःकरण. आपण निर्माण केलेल्या मानवजातीवर प्रेमाची पाखरण घालून तिचें दुःख दूर करणाऱ्या महाभागांकडे परमेश्वराची चटकन नजर वळते. आपल्या मुलांबाळांपासून तों मानवबांधवांपर्यंत सर्वांवर प्रेम करणाऱ्या थोर माणसावर परमेश्वराची ताबडतोब कृपादृष्टि होते.

> **" परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांचें**

**कल्याण करा; कारण जे कल्याण करतात त्यांच्या-वर परमेश्वर प्रेम करतो. ”**

—पवित्र कुराण, २ : १९१

परमेश्वराचें प्रेम संपादन करण्याकरितां आपण मानवजातीच्या कल्याणाकडे आपली दृष्टि ठेविली पाहिजे. परमेश्वरानें निर्माण केलेल्या यच्चयावत् प्राणिमात्रांचें कल्याण करणें म्हणजेच परमेश्वराची मर्जी संपादन करणें होय. नुसत्या धार्मिक अवडंबराकडे पाहून परमेश्वर कधींच प्रसन्न होत नाहीं. धार्मिक अवडंबर म्हणजे निव्वळ ढोंग, निव्वळ फसवणूक; मूर्ख व अविचारी समजुतीवर उभारलेला तो एक देखावा; असल्या देखाव्यानें परमेश्वर कधींच फसत नाहीं. परमेश्वराचा विश्वास, प्रेम संपादन करावयाचें असेल तर त्याला एकच राजमार्ग आहे आणि तो म्हणजे प्राणिमात्राचें कल्याण करणें होय

**“ विचारांत आणि एकलकोंडेपणांत काळ कंठणाऱ्या मुसलमानापेक्षां दुसऱ्याशीं मिळूनमिसळून त्यांचा दुःखभार हलका करणारा मुसलमान कितीतरी श्रेष्ठ होय. ”**

-हजरत महंमद पैगंबर.

आपल्या हातून शक्य होईल तितकी खटपट लोकांच्या कल्याणाकरितां केली पाहिजे, शक्य ते मार्ग लोकांच्या सौख्याकरितां चोखाळले पाहिजेत. मला जगाच्या कल्याणाशीं काय करावयाचें आहे? माझ्या कुटुंबाचें कल्याण झालें कीं बस्स! अशी स्वार्थी वृत्ति आपण

कधींहि स्वीकारतां कामा नये. आपण दुसऱ्यांशीं मिळूनमिसळून वागलें पाहिजे आणि त्यांचा दुःखभार हलका करण्याचा आपल्या हातून होईल तितका प्रयत्न केला पाहिजे. सर्व जगाशीं फटकून फक्त आपल्याच विचारांत दंग असणाऱ्या गृहस्थास इस्लाम-धर्मांत जागा नाहीं.

**" संन्यासी वृत्तीस इस्लाम-धर्मांत मनाई आहे."**

—हजरत महंमद पैगंबर.

लोककल्याणाचें, लोकसेवेचें महत्तम कार्य सोडून जंगलांत जाऊन तपश्चर्या करीत बसण्याचा मार्ग इस्लाम–धर्मास पसंत नाहीं. आपल्या भोंवतालच्या लोकांच्या अडीअडचणी दूर करणें, त्यांची जुलुमजबर-दस्तींतून सुटका करण्याचा प्रयत्न करणें, त्यांना सौख्य मिळण्याकरितां परिश्रम करणें हें मानवसेवेचें महत्पुण्य जंगलांत जाऊन बसण्यानें कधींच मिळत नाहीं· खरा मोक्ष लोकांचें कल्याण करण्यांत आहे. खरी सद्गति मानवाची सेवा करण्यांत आहे. जनतेची सेवा हीच खरी तपस्या आणि हीच खरी परमेश्वराची भक्ति होय.

**" मानवाची सेवा ही परमेश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ति होय. "**

—हजरत महंमद पैगंबर.

परमेश्वराची भक्ति संपादन करण्याकरितां निष्कारण उपासतापास किंवा व्रतवैकल्यें करावीं लागत नाहींत. आपल्या वाणीनें मानव-जातीस संतोषित करणें, आपल्या कृतीनें त्यांचा दुःखभार हलका

करणें, आपल्या शक्तीनें त्यांच्यावर कोसळत असलेले दुर्धर प्रसंग टाळणें, हीच मानवसेवा होय. या मानवसेवेचें कंकण हातीं बांधणाऱ्या सत्पुरुषास परमेश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ति केल्याचें श्रेय लागतें.

**" मानवजातीच्या कल्याणाकरितां मुसलमानांची जात निर्माण झाली आहे. "**

——पवित्र कुराण, ३ : १०९

या वाक्यांत मानवजातीचें कल्याण हें इस्लाम-धर्मीयांचें ध्येय आहे हें स्पष्टपणें विशद केलें आहे. ज्या भावनेनें आपण आपल्या कुटुंबाचें कल्याण चिंतितों त्याच भावनेनें अखिल मानवजातीचें कल्याण चिंतण्यास आपण तयार झालें पाहिजे. जात, गोत आणि धर्म यांना ओलांडून सर्व मानवांच्या स्वास्थ्याकरितां आणि समाधानाकरितां आपण सदैव उद्युक्त झालें पाहिजे. मानवांची सेवा हाच आपला धर्म ही कल्पना आपल्या अंतःकरणावर संक्रांत झाली पाहिजे.

ज्यांच्यावर संकटें कोसळत आहेत असे अनेक लोक दुःखाचे सुस्कारे सोडीत आहेत, ज्यांच्यावर दुर्दैवाचा फेरा आला आहे असे कित्येक लोक काळजीनें ग्रस्त झाले आहेत, ज्यांच्यावर अत्याचार होत आहेत असे असंख्य लोक विव्हळत पडले जाहेत, ज्यांच्यावर उपासमारीचा दुर्धर प्रसंग येऊन ठेपला आहे असे कितीतरी कंगाल लोक आपल्या कच्च्याबच्च्यांना उराशीं धरून त्यांच्याकडे डबडबलेल्या अश्रूंनीं पाहत आहेत. आपल्या अंतःकरणाचा ठाव घेणारीं अशी असंख्य दृश्यें आज सगळीकडे आपल्या दृष्टीस पडत आहेत.

अशा दुःखी-कष्टी, अनाथ आणि गांजलेल्या मानवांस साहाय्य करणें, त्यांच्या दुःखनिवारणार्थ धांव घेणें, त्यांच्यावर होणाऱ्या जुलमास पायबंद घालणें, त्यांच्या सौख्याकरितां आणि समाधानाकरितां अहोरात्र झटणें हें इस्लाम-धर्माचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक मुसलमानाचें पवित्र कर्तव्य आहे. या पवित्र कर्तव्याची, या मानवतेची जोपासना करणें हेंच इस्लाम-धर्माच्या नीति-शास्त्राचें सारसर्वस्व होय

समाप्त